मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग`ा, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/नोंदणी क्र.४९४९९/अपील क्र.६१००/२०१०

श्री. दिलीप पांडूरंग सूर्यवंशी अपीलार्थी
आयरिश पार्क, अे-२१,दुसरा माळा,
पटेल इस्टेट रोड, आंबोली पो.ठाणेच्या बाजुस
जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई १०२

विरुध्द

१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त, परिमंडळ-९
हिल रोड, बांद्रा (पश्चिम)मुंबई.५०

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त उत्तरवादी
पश्चिम नियंत्रण कक्ष व माहिती अधिकारी यांचे कार्यालय,
बांद्रा पश्चिम, मुंबई ५०

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक २६.८.२०१०
सुनावणीचा दिनांक १/१२/२०१०.
अपीलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

१. अपिलकर्ता यांनी दि.७.३.२०१० रोजी सहाय्यक पोलिस आयुक्त,पश्चिम नियंत्रण कक्ष, जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये खाली नमूद केलेली माहिती मागितलेली आहे :-

१. वर्सोवा पोलिस ठाणे, गु.र.क्र.३०२/०६, कलम-३०७,३५३ भादविसह कलम३, २७ भाहका अन्वये ११/११/२००६ रोजी दाखल करण्यांत आला आहे. सदर गुन्हयाबाबत नोंद करण्यांत आलेल्या सर्व ठाणे दैनंदिनाच्या प्रती तसेच सदर गुन्हयाच्या संदर्भात विविध कार्यालयाशी केलेल्या पत्र व्यवहाराच्या जावक व आवक कागदपत्रांच्या प्रती मिळण्यबाबात. तसेच सदर गुन्हयाचे आजतागायत केलेल्या तपासाच्या प्रती मिळाव्यात.
२. वर्सोवा पोलिस ठाणे गु.र.क्र.२४६/०९, कलम-३०२, ३६४, ३४भादवि अन्वये दिनांक १०.११.२००९ रोजी दाखल करण्यांत आला आहे. सदर बाबत नोंद करण्यांत आलेल्या सर्व पोलिस ठाणे दैनंदिनी, तसेच सदर गुन्हयात दि.७.४.२०१०पर्यत अटक करण्यांत आलेल्याआरोपीतांचे सर्व अटक मेमो व ठाणे दैनंदिनीची प्रती तसेच सदर गुन्हयाच्या संदर्भात विविध कार्यालयाशी केलेल्या पत्र व्यवहाराच्या जावक व आवक कागदपत्राच्या प्रती मिळण्याबाबत.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.३०.४.२०१० रोजी पोलिस उपआयुक्त, विशेष तपास पथक, पोलिस ठाणे यांची माहिती संदर्भ क्र.२ व ४ अन्वये या कार्यालयास प्राप्त झाला असून ती सोबत पृष्ठ क्र.१ ते ३ प्रमाणे जोडलेली आहे. वर्सोवा पोलिस ठाण्याने गु.र.क्र.३०२/०६ ची माहिती मिळण्याबाबत ओशिवरा पोलिस ठाणे यांना पत्र पाठविले असून सदरील माहिती प्राप्त होईल ती आपणास पुरविण्यांत येईल, असे अपिलार्थीस

कळविण्यांत आले आहे. परंतू उपरोक्त दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थी यांचे समाधान न झ ााल्यामुळे अपिलार्थी यांनी दि.२०.५.२०१० रोजी पोलिस उपआयुक्त, यांचेकडे प्रथम दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.२५.६.२०१० रोजी देण्यांत आला असून अपिलार्थी यांना समाधानकारक उत्तर दिलेले असल्यामुळे अपिल फेटाळण्यांत आलेले असल्याचे दिसून येते. परंतू त्यानेही समाधान झालेले नसल्यामुळे अपलिार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केलेले आहे.

४. अपिलार्थी यांनी आयोगाकडे युक्तीवाद करताना असे सांगितले की, जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्यामध्ये सदर गुन्हयाबाबत नोंद करण्यांत आलेल्या ठाणे दैनंदिनी, तसेच सदर गुन्हयाच्या संदर्भामध्ये विहित कार्यालयास केलेल्या पत्रामध्ये जावक व आवक कागदपत्राच्याप्रती तसेच पोलिस ठाणे दैनंदिनी, सदर गन्हयात दि.७.४.२०१० पर्यत अटक करण्यात आलेल्या सर्व अटक मेमो व ठाणे दैनंदिनीची प्रती तसेच सदर गुन्हयाच्या संदर्भात विविध कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या जावक व आवक कागदपत्रांच्या प्रती अद्यापपर्यत त्याबाबतच्या कोणतेही कागदपत्र उपलब्ध करुन दिलेले नाहीत. पोलिस निरिक्षक यांनी आयोगाकडे खुलासा दाखल करताना सदर गुन्हयाच्या संदर्भामध्ये मा.उच्च न्यायालयात क्रिमिनल केस क्र.२४७३/०६ अन्वये दाखल झाल्याने त्याबाबतचा तपास उच्च न्यायालयाचे आदेशाने तत्कालीन मा.महानगर दंडाधिकारी श्री.व्ही.एस.कुलकर्णी व नंतर श्रीमती शेख, रेल्वे मोबाईल कोर्ट,अंधेरी,पूर्व मुंबई यांना देण्यांत आल्याने गुन्हयाचे मुळ कागदपत्रे त्यांच्या कार्यालयाचा जावक क्रमांक २६९/०८ दि.२८.२.२००८ अन्वये मागविल्याने सदर गुन्हयाचे मुळ कागदपत्रांची सूची तयार करुन त्यास अनु.क्र.१ ते २८० पर्यत देऊन पोलिस ठाण्याचा जावक क्रमांक १८०२/०८ दिनांक २९.२.२००८ अन्वये मा.उच्च न्यायलायात सादर करण्यांत आला असून मा.न्यायालयाने सदर बाबत तपास करुन नमूद गुन्हयाची मुळ कागदपत्रे पररस्पर मा.उच्च न्यायालयात सादर केलेली असून ती उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत, असे सांगितले. परंतू अपिलकर्ता यांचे म्हणणे असे की, आरोपीच्या विरोधात कलम ३०२ चा गुन्हा दाखल केलेलस असून जेलमध्ये आहे. त्या आरोप पत्राच्या संदर्भात जी कागदपत्र दिलेली आहेत. परंतू तरीही जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या गुन्हयाच्या संदर्भामध्ये तपास सुरु असल्यामुळे तपास पूर्ण होईपर्यत कागदपत्र उपलब्ध करुन देता येणार नाही. परंतू हयाबाबत अपिलकर्ता यांना कळविलेले नसल्यामुळे जन माहिती अधिकारी, सहायक पोलिस आयुक्त यांनी आयोगास प्रतिज्ञापत्र तात्काळ दाखल करण्यांत सांगितलेले असताना सदर प्रतिज्ञापत्र सहा.पोलिस निरिक्षक यांनी दाखल केलेले आहे. वास्तविक आयोगाने सहायक पोलिस आयुक्त यांनीच प्रतिज्ञापत्र दाखल करावे अशा सूचना दिलेल्या होत्या. परंतू सहायक पोलिस आयुक्त यांनी ते दाखले केलेले नसल्याने आयुक्तांच्या आदेशाचा अवमान केलेला आहे.

५. वास्तविक जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलिस आयुक्त यांनी सुध्दा अधिनियमाच्या कलम १९ (५)प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा माहिती कां उपलब्ध करुन देता येत नाही हे सिध्द करण्याकरिता त्यांनी आयोगापुढे समक्ष हजर राहणे आवश्यक असते. सुनावणीस त्या स्वत: हजर न राहता त्यांनी शारिरीक त्रास होतो या कारणास्तव उपस्थित राहता येत नाही, म्हणून पोलिस उपनिरिक्षक यांचे मार्फत आयोगापुढे पत्र पाठवून

आयोगाचा अवमान केलेला आहे. ' सहायक पोलिस आयुक्त ' हे पद फार मोठे नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाची दिशाभूल करुन अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे त्यांच्या विरुध्द प्रशासकिय कारवाई ही पोलिस आयुक्त यांनी करणे आवश्यक आहे. प्रतिज्ञा पत्र सुध्दा दाखल करताना त्यांनी स्वत: उपस्थित राहून ते दाखल करणे आवश्यक होते, ते त्यांनी स्वत: दाखल केलेले नाही. तसेच अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल, त्यामुळे अपिल मंजूर पात्र आहे.

*---आदेश---*

१. अपिलकता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून अपिलकर्ता यांना त्यांच्या दि.६.४.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती विनामूल्य हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत उपलब्ध करण्यांत यावी व तसे न केल्यास जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलिस आयुक्त हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.
२. सदरच्या निर्णयाची एक प्रत पोलिस आयुक्त, मुंबई यांच्याकडे पुढील कारवाईसाठी स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.
३. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.१/११/२०१० (विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबइ

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/अपील क्र.६१०७/२०१०**

**श्री. मिलिंद काशीराम मोरे,** **अपीलार्थी**
**वरळी, बी.डी.डी.चाळ क्र.४५**
**खोली क्र.१५ डॉ.बी.एम.भोसले मार्ग,**
**वरळी,मुंबई ४०००१८**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव**
**उच्च तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,विस्तार भवन, मुंबई ३२**

**२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव** **उत्तरवादी**
**उच्च तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,विस्तार भवन, मुंबई ३२**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक २५.८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १/१२/२०१०.**
**अपीलार्थी, व जन माहिती अधिकारी अनुपस्थित.अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**२.** **अपिलार्थी यांनी दि.१२.४.२०१०रोजी जन माहिती अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांच्याकडे शासन निर्णय व क्र.आयटीआय १००४/प्र.क्र.२८८/ व्यशि-२, दि.१४ जुलै, २००४ अन्वये नमूद केल्याप्रमाणे संबंधित कर्मचा-यांना शक्य असेल तेथे रिक्त जागा समायोजित करण्यांत याव्यात, असे असताना महाराष्ट्र ट्रीब्युनल बंच यांचेकडे ओरिजनल ॲप्लीकेशन नं.७६० च्या २००७ मध्ये रिपोर्ट क्र.२ मा.उपसंचालक व्यवसाय व प्रशिक्षण कार्यालय ४९ खेरवाडी अलियावर जंग मार्ग, खैरवाडी वांद्रे पूर्व मुंबई यांचेमार्फत के.एन.धाडगे इन्स्पेक्टर यांनी प्रतिज्ञा पत्र दाखल केले. यामध्ये दि.१४.७.२००४ रोजी शासन निर्णय लागू नाही असे नमूद केले आहे ते योग्य आहे का? असे विचारलेले आहे व माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे.**

**३.** **सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलार्थी यांनी दि.१८.५.२०१० रोजी हे अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.१२.७.२०१० रोजी देण्यांत आला असून माहिती अधिकारी यांनी श्री. मिलिंद मोरे यांचे दि.१२.४.२०१०रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जे शासन निर्णय उपलब्ध असतील तेअर्जदारास उपलब्ध करुन देण्यांत याव्यात. अशा प्रकारचा निर्णय देण्यांत आला त्याने समाधान न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.**

**४.** **जन माहिती अधिकारी हे उपस्ति नव्हते. ते महाराष्ट्र विधान मंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी नागपूर येथे गेलेले असल्याचे आयोगापुढे प्रथम अपिलीय अधिकारी**

यांनी सांगितले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रानुसार जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री.किरण जाधव यांनी अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचा-यांच्या पदांना मुदतवाढ देण्याबाबतच्या शासन निर्णयाची मागणी केलेली आहे. सदर प्रकरणी माहितीचा अधिकार अन्वये मागविण्यांत आलेले शासन निर्णय आजच शासनास सादर करावे हि विनंती असे सहसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग कार्यालय,मुंबई यांना पत्र दिलेले दिसून येते.परंतू त्याप्रमाणे शासन निर्णय हे उपलब्ध झाले नाहीत. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये सुध्दा कागदपत्र मागितलेले आहेत ती उपलब्ध करुन द्यावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू अपिलकर्ता हे नंतर उपस्थित झाले व त्यांनी आयोगाचे निदर्शनास असे आणले की, त्यांनी प्रतिज्ञापत्रामध्ये दि.१४.७.२००४ चे शासन निर्णय लागू नाही,असे नमूद केलेले आहे ते योग्य आहे का ? अशी माहिती त्यांना विचारली होती व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

५. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या केलेल्या (२) (च)मध्ये ' माहिती ' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे त्या व्याख्येमध्ये 'कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख दस्तऐवज ज्ञापने ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा,अहवाल, कागदपत्रे नमूने प्रतिमान (मॉडेल)कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधार सामुग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती,याचा समावेश होतो ' तसेच कलम २((त्र)मध्ये 'माहितीचा अधिकार' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे त्या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळविला येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार आहे तसेच अभिलेख्याचे निरिक्षण करुन त्यांच्या छायाकित प्रती उपलब्ध करुन घेणे अशी तरतूद आहे, यावरुन उपलब्ध कागदपत्रांच्या छायांकित प्रती पुरविणे असा थोडक्यात 'माहितीचा अधिकार' आहे.

६. अपिलकर्ता यांनी प्रतिज्ञापत्रामध्ये शासन निर्णय लागू नाही हे योग्य आहे का ?असा प्रश्न विचारला आहे. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय/अभिमत त्यांना अपेक्षित आहे. परंतू प्रतिज्ञापत्र एका व्यक्तीने केलेले आहे व माहिती ही दुसरी व्यक्ती देणार आहे. त्यामुळे एखाद्या प्रकरणाच्या गुणवत्तेबाबत घेतलेल्या निर्णयाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी हे मत व्यक्त करु शकत नाही व जन माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीप्रमाणे फक्त 'माहिती पुरविणारे' अधिकारी आहेत व त्यामुळे अपिलकर्ता यांनी जन माहती अधिकारी यांचे जे मत मागितलेले आहे ते अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे नसल्यामुळे ते जन माहिती अधिकारी यांना व्यक्त करता येणार नाही.

७. वास्तविक अशा प्रकारचे उत्तर हे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना देणे अपेक्षित होते परंतू जन माहिती अधिकारी यांनाच मागितलेल्या माहितीचे कोणतेही

आकलन झालेले दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती हया सहसंचालक यांच्याकडे मागितल्या. वास्तविक शासन निर्णय हे शासनाकडे असतात ते संचालनालयाकडे अंमलबजावणीसाठी जातात. अपिलकर्त्याच्या प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू तो निरर्थक आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे नसल्यामुळे सदरील अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

---आदेश---

१. अपिल निकाली काढण्यांत येते.
२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.१/११/२०१०

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबइ

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्र-मुमाआ /तक्रार क्र.१४८६/२०१०

श्री. मेहमूद शेख — अपीलार्थी
रुम नं.७, दोस्त मो.चाळ,
नित्यानंतर नगर घाटकोपर वेस्ट
मुंबई ४०००८६

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरिक्षक — उत्तरवादी
अनुज्ञापन (अतिक्रमण)
एन विभाग घाटकोपर( पूर्व) मुंबई

***---निर्णय---***

तक्रारीचा दिनांक २०.८.२००८

सुनावणीचा दिनांक १/१२/२०१०.

तक्रारदार व जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

तक्रारदार यांनी दि.३.४.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम १८(१)प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदाराच्या दि.२६.११.२००७ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने माहिती मिळालेली नाही व दि.१.१.२००८ च्या प्रथम अपिलाच्या निर्णयाच्या अपिलामध्ये जन माहिती तथा वरिष्ठ निरिक्षक, अनुज्ञापन (अतिक्रमण)एन वॉर्ड, घाटकोपर, पूर्व, मुंबई यांनी तक्रारदाराने मागितलेली माहिती ही संकलित करण्यासाठी कार्यालयाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागेल या कारणास्तव नाकारलेली आहे. त्यामुळे सदरील तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

मुंबई
दि.२/११/२०१० — (विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्र-मुमाआ /तक्रार क्र.९८७/२०१०**

**श्री.शेख अजीजभाई अब्दुल कादर** — **तक्रारदार**
**४४, नाईकवाडापुरा, संगमनेर,**
**जि.अहमदनगर- ४२२ ६०५**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा** — **उत्तरवादी**
**पोलिस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई ४०० ०३९**

***---निर्णय---***

**तक्रारीचा दिनांक १३.११.२००६**
**सुनावणीचा दिनांक २/१२/२०१०.**
**तक्रारदार अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**३. तक्रारदार यांनी दि.२५.१.२०१० रोजी व्दितीय अपील क्र.२००८/२१६/०२ मध्ये दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही म्हणून अधिनियमाच्या कलम १८ (१)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये 'माहिती अधिकार अन्वये दुस-या अपिलात मा. माहिती आयुक्तांकडून दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न करणा-या अधिका-याविरुध्द कारवाई करण्यासंबंधी सामान्य प्रशासन विभाग,मुंबई यांनी दि.३ ऑगस्ट २००९ रोजी एक अध्यादेश काढल्याचे वर्तमापत्रात वाचनात आले. कृपया त्या अध्यादेशाची प्रत पाठविण्याची तसदी घ्यावी तसेच मला नुकसान भरपाई रुपये ५०००/- देण्यांत यावे असे आदेश व्हावेत,' असे नमूद केलेले आहे.**

**४. सदरच्या व्दितीय अपिलाच्या निर्णयाप्रमाणे दि.१०.१२.२००८ रोजी विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र राज्य, अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तक्रादारास पाठविण्याबाबत विशेष पोलिस महानिरिक्षक, नासिक परिक्षेत्र नासिक यांना सुचना देण्यांत आलेल्या आहेत व सदरचे पत्र दि.१५.१२.२००८ रोजी तक्रारदारास मिळालेले आहे असे दिसून येते. दि.७.१.२०१० रोजी श्री.एस.पी.कुलकर्णी, कार्यालयीन अधिक्षक, तथा माहिती अधिकारी पोलिस महानिरिक्षक,नासिक परिक्षेत्र,नासिक यांनी तक्रारदाराचे दि.१७.१२.२००९ च्या अर्जाच्या संदर्भात कार्यालयाने काहीही कार्यवाही केलेली नसल्याने आपणास याबाबत माहिती देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. तक्रारदार यांनी कार्यालयात दि.१७.१२.२००९ रोजी अर्ज सादर करुन अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांच्या शिफारशीनुसार तात्काळ कार्यवाही करुन अहवालाची प्रत पाठविण्याबाबत विनंती केलेली होती. परंतू हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने या कार्यालयाने याबाबत कार्यवाही न केल्यामुळे त्याबाबत श्री.शेख आमिन**

यांना दि.७.१.२०१० रोजी कळविण्यांत आले आहे. तसेच पूर्वीच्या राज्य माहिती आयोगाच्या निर्णयामध्ये अपिलार्थीस पोलिस महानिरिक्षक यांनी दिलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहावयाची असल्यास त्यांना संबंधित कागपत्राची पाहणी करण्यासही हरकत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे तक्रारदारानी पोलिस महानिरिक्षक यांनी दिलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये खात्री करुन घेण्यासाठी कागदपत्राची पाहणी करणे आवश्यक होते परंतू तक्रादारानी त्याबाबतीत काहीही उल्लेख केलेला नाही व इतर कागदपत्राचे अवलोकन केले असता, अपिलकर्ता यांनी पूर्वी व नंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याचे दिसून येते त्यामुळे तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

***---आदेश---***

१. तक्रार निकाली काढण्यांत येते.
२. तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.२/११/२०१०

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबइ

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/अपील क्र.६१८८/२०१०

श्री. नितिन तुकाराम गवाणकर — अपीलार्थी
०५ ावाणकर निवास,साईकृपा बिल्डिंग समोर
शिववल्लभ रोड, दहिसर पूर्व, मुंबई ४०००६८

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/एन विभाग कार्यालय,
फ्लायओव्हर ब्रिजच्या खाली, जयवंत सावंत मार्ग, दहिसर पूर्व,मुंबई

२. जन माहिती अधिकारी तथा पेस्ट कंट्रोल अधिकारी — उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/एन विभाग कार्यालय,
फ्लायओव्हर ब्रिजच्या खाली, जयवंत सावंत मार्ग, दहिसर पूर्व,मुंबई

---*निर्णय*---

व्दितीय अपीलाचा दिनांक ५.३.२०१०
सुनावणीचा दिनांक ६/१२/२०१०.
अपीलार्थी, व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.१२.१०.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, पेस्ट कंट्रोल अधिकारी, आर/नॉर्थ, बृहन्मुंबई महानगरपालिका, बोरीवली, यांचेकडे बोअरवेल खोदण्यासाठी किती अर्जदाराना परवानगी दिली, तसेच सर्व्हिस स्टेशन व गॅरेजच्या संदर्भामध्ये आर.एम.भोईर वाडी, गोकुळआनंद हॉटेल जवळ,दहिसर पूर्व आजच्या तारखेपर्यत किती अर्जदारांना परवानगी दिली, अशी माहिती मागितली. सदरील माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि.१०.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू अपूर्ण माहिती दिल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.१९.११.२००९ रोजी प्रथम अपिल दाखल केले. परंतू प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल केल्यानंतर अपिलीय अधिकारी यांनी उपविधी अधिकारी, यांचा सल्ला घेणेसाठी जन माहिती अधिकारी यांना आदेश देण्यांत आले. त्यानुसार दि.२१.१२.२००९ रोजी सर्व कागदपत्राच्या प्रती उपविधी अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यांत आल्यानंतर त्या दूरध्वनीव्दारे सहाय्यक आयुक्त, आर/डी, प्रथम अपिलीय अधिकारी यांना कळविण्यांत आले की, सदर दिलेली माहिती परिपूर्ण असून ही माहिती अर्जदारास देता येणार नाही व जन माहिती अधिकारी यांना अपिलकर्त्यास कागदपत्र देण्यांत येऊ नये, असे आदेश दि.२९.१२.२००९ रोजी देण्यांत आले व त्यानंतर

दि.२८.१.२०१० रोजी उपविधी अधिकारी यांनी पुन्हा  याबाबत निर्णय जन माहिती अधिकारी यांनी घ्यावयाचा आहे असे पत्राव्दारे कळविण्यांत आले व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यांत आलेली नाही.

५. जन माहिती अधिकारी यांना आयोगाने असे विचारले की, बोअरवेल काढण्याकरिता त्यांच्या विभागाची परवानगी आवश्यक आहे का ? त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास परवानगी आवश्यक असते असे सांगितले.

६. कोणत्याही प्रकल्पास एखाद्या प्राधिकरणाची परवानगी विशिष्ट कार्यवाहीकरिता आवश्यक असेल तर तो अर्ज त्या संदर्भातील सर्व कागदपत्र हे सार्वजनिक अभिलेखे होतात व त्यामुळे सार्वजनिक अभिलेख्याच्या स्वरुपात असलेली कागदपत्रे ही अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे उपलब्ध करुन देणे आवश्यक असते.  बोअरवेल खोदण्याच्या परवानगीच्या संदर्भामध्ये प्रत्येक अर्जदाराला जे कागदपत्र उपलब्ध असतील ते अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिले असते किंव बोअरवेल व्यापक प्रमाणात असतील तर  जन माहिती अधिकारी यांनीअधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे अर्जदारास सदरच्या अभिलेख्याचे निरिक्षण करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात यावेत व निरिक्षणा अंती नस्तीतील आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ (२)(त्र)अन्वये संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

*---आदेश---*

१. अपिलकता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आतत्यांच्या दि.१२.१०.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती तपशिलात कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामूल्य  उपलब्ध करण्यांत यावी व मागितलेली माहिती व्यापक स्वरुपात असल्यास अपिलकर्ता यांना सदर नस्ती निरिक्षणास उपलब्ध करुन द्यावी त्याकरिता त्यांना पत्राने कळवावे. त्याकरिता अपिलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती मागितलेली असल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे कडे संपर्क साधावा.

२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.६/१२/२०१०

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबइ

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/४९३११/अपील क्र.६१२५/२०१०

श्री. चंद्रकात पंढरीनाथ कुलकर्णी — अपीलार्थी
५, पितळेवाडी, हनुमान रोड, विलेपार्ले पूर्व
मुंबई ४००० ५७

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका, सी-विभाग कार्यालय,
७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी, मुंबई ४०० ०२

२. जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.) — उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, सी-विभाग कार्यालय,
७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी, मुंबई ४०० ०२

---*निर्णय*---

व्दितीय अपीलाचा दिनांक निरंक
सुनावणीचा दिनांक ६/१२/२०१०.
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

३. अपिलकर्ता यांचा दिनांक (निरंक)असलेला अर्ज कार्यालयात प्राप्त दि.२३.३.२०१० रोजी प्राप्त झाला. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी सी विभाग, बृहन्मुंबई यांचे कडे ११९-१२७ खेमका चाळ येथे बांधण्यांत आलेल्या एटीएमबाबत नोव्हेंबर २००९ पासून ते आजमितिपर्यंतची माहिती. तसेच गाळाधारकाने सदर जागेच्या वापरात बदल करताना (व्यावसायिक तत्वावर)महानगरपालिकेच्या संबंधित खात्याकडून लिखित स्वरुपात परवानगी घेतली होती का? संबंधित गाळाधारक व एटीएम चालविणा-या संबंधित बॅक या दोघांमध्ये कायदेशीर करारपत्र झाले आहे? सदर एटीएमचे बांधकाम करण्यापूर्वी पालिकेच्या संबंधित खात्याची पूर्व परवानगी घेण्यांत आली आहे का तसेच एटीएम मशीन कार्यरत करण्यापूर्वी बेस्ट प्रशासनाची लिखित परवानगी घेण्यांत आली आहे काय? इत्यादि माग्शितली असल्याचे दिसून येते.

सदरील अर्जाच्या अनुषंगाने दि.२२.४.२०१० रोजी मुद्दा क्र.अ, ब, क या सदराव्दारे विचारलेली माहिती या कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध नसल्याने पुरविता येणे शक्य नाही. परंतू त्याने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२६.४.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.१८.५.२०१० रोजी देण्यांत आला असून कागदपत्र मिळविण्यासाठी सखोल तपासणी करावी व दोन आठवडयात माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांना

अभिलेख्यावर उपलब्ध नसल्याने पुरविता येणे शक्य नाही याचा अर्थ परवानगी घेतलेली आहे किंवा नाही हे स्पष्ट होत नाही. अभिलेखे उपलब्ध नाही याचा अर्थ अभिलेखे गहाळ झालेले असावेत किंवा जन माहिती अधिकारी हे माहिती लपवित असावेत असा अर्थ निघू शकतो. त्यामध्ये स्वतंत्रपणे परवानगी घेतलेली आहे किंवा नाही व घेतली नसल्यास त्यावर काय कार्यवाही केली असे स्पष्ट कळविले असते तर अपिलकर्ता यांना प्रथम अपिल किंवा व्दितीय अपिल करण्याची आवश्यकता राहिली नसती. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा त्यांच्या प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये कोणत्याही प्रकारचे विश्लेषण केलेले नाही. तसेच माहितीच्या अभिलेख्यांचा तपास करुन उपलब्ध करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी एवढेच निरर्थक असे आदेश दिलेले आहेत ते निरर्थक एवढया करीता त्या आदेशाचे पालन झालेले नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांचे ते अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

*---आदेश---*

१. अपिलकता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अर्जदाराचे दि.२३.३.२०१० च्या अर्जातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भामध्ये परवानगी घेतली होती किंवा ही हे स्पष्टपणे कळवावे व त्या अनुषंगाने अ,ब,व क मुद्दयाबाबत माहिती उपलब्ध करुन द्यावी

२. सदरची माहिती अपिलार्थी हे व्यक्तिशः घेणार असल्यामुळे अपिलर्क्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.६/१२/२०१०

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबइ

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/४९३१२/अपील क्र.६१२९/२०१०

श्री. चंद्रकात पंढरीनाथ कुलकर्णी अपीलार्थी
५, पितळेवाडी, हनुमान रोड, विलेपार्ले पूर्व
मुंबई ४००० ५७

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग कार्यालय,
एम.जी.छेद रस्ता क्र.२,कांदिवली पश्चिम, मुंबई ४०००६७

२. जन माहिती अधिकारी तथा सह.अभियंता उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग कार्यालय,
एम.जी.छेद रस्ता क्र.२,कांदिवली पश्चिम, मुंबई ४०००६७

***---निर्णय---***

व्दितीय अपीलाचा दिनांक निरंक

सुनावणीचा दिनांक ६/१२/२०१०.

अपीलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित

अपिलार्थी यांनी दिनांक निरंक असलेल्या जन माहिती अधिकारी, आर/दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे सर्व्हे नं.१४९, सी.टी.एस. नं.१ ब या भूभागावर झालेल्या अतिक्रमणाबाबत लेखी माहिती सन १९७८ ते आजमितीपर्यतची माहिती तसेच पुढील मुद्यांवर माहिती मागितली होती.

अ) विशाल सहयाद्री सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, चारकोप, कांदिवली पश्चिम मुंबई-६७ सदर जागेवरील गृहनिर्माण संस्थेचे कार्यालय अधिकृत आहे का?

ब) सदरहू गृहनिर्माण संस्थेने सदर जागेवर बांधकाम करताना महानगरपालिकेच्या संबधित खात्याची आराखडयांसह परवानगी घेतली आहे का याबाबतची लिखित माहिती मिळावी.

क) तसेच सदर भूभागावर कापड बाजार कामगार सहकारी सेवा सोसा. लि.हयांनी देखील सदर जागेवरबांधकाम करताना महानगरपालिकेच्या संबंधित खात्याचा आराखडयासह परवानगी घेतली आहे. याबाबतची लिखित माहिती मिळावी.

ड) सर्व्हे नं.१४९, सी.टी.एस.नं.१ ब हया भूभाग मूलतः कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई हयांच्या नोंदणीकृत कामगांराकरिता (नोकरीचे नियमन व कल्याण अधिनियम १९६९ कलम ६ (१)अन्वये महाराष्ट्र शासन आस्थापित) याजकरिता आरक्षित असताना देखील सदर जागेवर उद्यानाचे बांधकाम करण्यांत आले आहे तेव्हा या वापरात बदल करण्याची परवानगी विशाल सहयाद्री सहकारी संस्थेने घेतली होती काय बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग कार्यालय ? असल्यास त्याची प्रत सादर करण्यांत यावी.

इऋ सहयाद्री सहकारी बॅकेने सदर जागेवर तीन मजली इमारतीचे बांधकाम करताना महानगरपालिकेच्या संबंधित खात्याची आराखडयांसह परवानगी घेतली आहे का याबाबतची लिखित माहिती मिळावी.

अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.३.४.३०१० यांनी मुद्या क्र.अ ची माहिती अभिलेखे उपलब्ध नाहीत तसेच मुद्दा क्र.ब च्या संदर्भामध्ये कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव)यांच्याशी संबंधित असल्यामुळे पुढील कार्यवाहीसाठी ती त्यांचेकडे अग्रेषित करण्यांत आले आहेत व मुद्दा क्र.क,ड,ई हेही वरील प्रमाणे अग्रेषित करण्यांत आले आहेत.

अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.२६.४.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.६.५.२०१० रोजी देण्यांत आला असून जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का) यांना मुद्देनिहाय उत्तर विहित मुदतीत दिलेले आहे. सदर अपिल निकाली काढण्यांत येते असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामध्ये समाधान झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतू जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांच्या विभागाच्या संबंधित नाही. परंतू कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) यांच्याशी संबंधित असल्यामुळे त्यांचा अर्ज त्यांच्याकडे अग्रेषित करण्यांत आला आहे व अपिल निकाली काढण्यांत आले असे निर्देश दिलेले असल्याचे दिसून येत आहे.

अपिलकर्ता यांनी संबंधित कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव)यांच्याकडे माहिती सापडत नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. त्यामध्ये सुध्दा अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही. अपिलकर्ता यांनी कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले असता त्यांना ती माहिती उपलब्ध झाली असती असे असले तरी अपिलकर्ता यांचा अर्ज हा हस्तांतरीत केलेला असल्यामुळे कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) यांच्या कार्यालयात जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतू ती त्यांनी उपलब्ध करुन न दिल्यामुळे अपिलकर्ता यांना आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल करावे लागले. संबंधित जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) यांच्या कार्यालयातील हा दोष आढळून येतो व त्यांच्या विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

***---आदेश---***

१. अपिलकता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव)यांनी माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी
२. जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, (इमारत प्रस्ताव)यांनी अर्जाचे हस्तांतरण झाल्यानंतर सुध्दा ३० दिवसामध्ये अपिलकर्ता यांना माहिती दिलेली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनिमय २००५ च्या कलम २० (१)अन्वये शास्ती कां लादण्यांत येऊ नये

**याचा खुलासा हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत माहिती आयोगाकडे करावा अन्यथा जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती लादण्यांत येईल याची नोंद घ्यावी**

३. **अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.६/१२/२०१०** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/४९६८४/अपील क्र.६१२७/२०१०**

**श्री. किरण चंद्रकांत मांजरेकर** **अपीलार्थी**
**४/३०६, सुगंध परबत नगर, एस.व्ही.रोड,**
**दहिसर पूर्व, मंबई ४०००६८**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**कार्यकारी अभियंता कार्यालय, मार्ग विकास विभाग क्र.ञ४**
**३ रा मजला, नविन प्रशासकिय इमारत,**
**अंधेरी पश्चिम मुंबई ४०० ०५८**

**२. जन माहिती अधिकारी तथा** **उत्तरवादी**
**कार्यकारी अअभियंता कार्यालय, मार्ग विकास विभाग क्र.४**
**३ रा मजला, नविन प्रशासकिय इमारत,**
**अंधेरी पश्चिम मुंबई ४०० ०५८**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक ८.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ६/१२/२०१०.**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित**

**२. अपिलकर्ता यांनी दि.२४.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.२.२०१०रोजी दुकाना संदर्भात दोन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली असल्याचे दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे घेणार असे नमूद केलेले आहे. अपिलकर्ता यांचे दि.१८.३.२०१० रोजी दि.११.२.२०१० रोजीची केलेली तक्रार उपप्रमुख अभियंता (रस्ते)पश्चिम उपरगरे यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यांत आली आहे. सदर पत्राच्या छायाकित प्रती उपलब्ध करुन देण्यासाठी या कार्यालयात रुपये २/- शुल्क भरल्यानंतर सदर पत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यांत येईल, असे कळविल्याचे दिसून येते. परंतू त्यांनतर अपिलकर्ता यांनी शुल्क भरणा न करता दि.१३.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले असल्याचे दिसून येते व त्यात कोणत्याही प्रकारचे आदेश प्राप्त झाले नाही असे कारण व्दितीय अपीलात दिलेले आहे.**

**३. अपिलकर्ता यांनी दि.९.६.२०१० रोजी पुन्हा माहिती अर्ज दाखल केला होता. त्यास उपविभागीय अभियंता, मार्ग विकास विभाग क्र.४ अंधेरी मुंबई यांनी नरेश (मुन्ना)ऑटो व्हिल अलाईन्मेंट नावाचे दुकान बोरीवली ते दहिसर पश्चिम द्रुतगती महामार्गावर अस्तित्वात नाही. करिता माहितीच्या अधिकारानुसार आपण मागितलेल्या अर्जाचे या कार्यालयाशी काहीही**

**संबंध नाही. असे कळविले असल्याचे दिसून येते व त्यामुळेच अपिलकर्ता यांनी व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केलेले आहे.**

**अपिलकर्ता यांनी दि.३.८.२०१० रोजी अभियांत्रिक विभागाकडे दि.२५.२.२०१० रोजी व त्यांचे पत्र दि.११.२.२०१० च्या प्रमाणे सदर दुकान नॅन्सी कॉलनी, वीर सावरकर मार्ग, एस.टी.डेपोच्या बाजुला बोरीवली, पूर्व या ठिकाणी आहे व त्यांना चुकीची माहिती दिलेली आहे असे त्यांनी उपविभागीय अभियंता यांनाच पत्रानुसार कळविलेले आहे. परंतू आज उपविभागीय अभियंता उपस्थित नव्हते तसेच जन माहती अधिकारी हेही उपस्थित नव्हते त्यामुळे अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती संदर्भामध्ये कोणतेही आदेश पारित करता येत नाही. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.**

***---आदेश---***

**१. अपिलकता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांचे अर्जाच्या अनुषंगाने योग्यती माहिती दिलेली नसल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१)अन्वये शास्ती कां करण्यांत येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत समक्ष येऊन त्यांचे म्हणणे त्यांनी मांडावे अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम कलम २० (१)अन्वये शास्ती कायम करण्यांत येईल.**

२. **अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई
**दि.६/१२/२०१०**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/४९४५४-/अपील क्र.६१४८/२०१०**

**श्री. बी.एच.दोशी,** **अपीलार्थी**
**बी-७०२, राज मनोर, नेवी कॉलनीसमोर,**
**मालाड (पश्चिम),मुंबई ६४**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक वेतन व भ.नि.नि.पथक**
**शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**

**२. जन माहिती अधिकारी तथा** **उत्तरवादी**
**शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक ७.८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ८/१२/२०१०.**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित**

**सर्व अपिलकर्ता यांनी अनुक्रमे दि.२१.४.२०१०, २१.४.२०१०, १९.४.२०१०, २६.६.२०१०, २२.४.२०१० ,२१.४.२०१० व २१.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांचेकडे त्यांचे पी.एफ. अकाऊंटच्या संदर्भामध्ये ledger extract मासिक ठेव/थकबाकी/व्याजाच्या संदर्भामध्ये सन १९९९ ते अर्जाच्या तारखेपर्यत व त्यापूर्वी यांना त्यांच्या संबंधित सेवेच्या संदर्भात वर्षाचा संबंध असेल त्या वर्षापासून माहिती मागितली असल्याचे दिसूनयेते. तसेच २० टक्के थकबाकीच्या करिता कोणता अधिकारी जबाबदार आहे त्यांची नावे देण्यांत यावीत अशी त्यांनी माहिती मागितलेली दिसूनयेते. सदरहूं माहिती ही टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.**

**सर्व अर्जदाराच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तथा वेतन व भविष्य निर्वाह निधी शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई यांनी दि.५.५.२०१० रोजी (काही पत्रा तारीख सुध्दा दिलेली नाही)मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये उत्तर दिलेले दिसून येते. परंतू सदर उत्तराने समाधान न झाल्यामुळे सर्व अपिलकर्ता यांनी अनुक्रमे दि.२८.८.२०१०,दि.१५.७.२०१०, दि.२८.६.२०१०,दि. २८.६.२०१०,दि.६.७.२०१०,दि.२८.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नाही. मात्र दि.२.१७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी उत्तर पाठविलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे सर्व अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले दाखल केलेली आहेत.**

**सर्व अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी माहितीच्या अधिकारात जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांना ledger** Book चे **सन २००० पासून आतापर्यतचे निरिक्षण देण्यांत आले परंतू त्यांच्या प्रती या उपलब्ध**

करुन देण्यात आलेल्या नाहीत. सन २००० पूर्वी च्या वर्षाच्या संदर्भामध्ये ज्या अर्जदाराचा संदर्भ असेल त्या अर्जदाराच्या संदर्भामध्ये **ledger** Book हे उपलब्ध नाही किंवा ते जीर्ण झालेले असल्यामुळे त्यांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन देता येणार नाही व ते गोडाऊनमध्ये आहे असे सांगितले. तसेच जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये अपिलार्थी गेले त्यावेळी त्यांना योग्य वागणूक देण्यांत येत नाही व माहितीचा अर्ज केला म्हणून त्यांची हेटाळणी केली गेली व त्यामुळेच माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती कां करण्यांत येऊ नये अशी विनंती सर्व अपिलर्थीनी केलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितल की, भविष्य निर्वाह निधीबाबत माहे २००० पासून ते आजातागायतचे लेखे उपलब्ध करुन देण्यांत आले होते व त्याही पूर्वी भविष्य निर्वाह निधी लेजरमध्ये घेतलेल्या मासिक वर्गणी थकबाकीचे आदेश त्यावरील व्याज इत्यादि बाबतची माहिती ज्या कालावधीत मागविण्यांत आलेली आहे त्या फार पूर्वीच्या कालावधीतील (१२वर्ष ते २६ वर्षे पूर्वीची) असल्या कारणाने सदरचे लेखे हे अत्यंत जिर्ण अवस्थेत असल्याकारणाने छायांकित प्रती वाचनीय होणार नाही, अशी दाट शक्यता आहे. तसेच जी माहिती मागविण्यांत आली आहे ती माहिती वेळोवेळी दरवर्षी भविष्य निर्वाह निधी विवरण पत्राव्दारे अर्जदारांना देण्यांत आलेली असते,असे असले तरी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची पडताळणी करण्याकरिता दि.३० जून २०१०पर्यत कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन दिली जाईल असे त्यांना कळविलेले होते. हे वेतन आराखडयानुसार भविष्य निर्वाह निधी देय पारित करुन घेऊन कर्मचा-याचा पहिला हप्ता भविष्य निर्वाह निधी मुदतीत जमा करण्याची जबाबदारीही संबंधित शाळेच्या/महाविद्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांची (मुख्याध्यापक/पाचार्य) असते. महाविद्यालयाच्या देयकात त्रुटी आढळल्याने देयक पारित झालेले नाही. सबब पहिला हप्ता जमा झालेला नाही. परंतू त्रुटींची पूर्तता त्वरीत केल्यास कार्यरत असलेल्या महाविद्यालयीन कर्मचा-यांचा पहिला हप्ता त्वरीत भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यांत येईल असेही कळविण्यांत आले होते. प्रथम अपिलाच्या नंतर सुध्दा दि.२१.७.२०१० रोजी सन २००० पासून ते २००९ पर्यत भविष्य निर्वाह निधीच्या लेख्याच्या नोंदी घेतलेल्या आहेत, लेखा वर्ष १९८४ ते २००० पर्यतच्या छायांकित प्रती जिर्ण असल्यामुळे त्याच्या छायांकित प्रती येणार नाही, अशा प्रकारे कळविण्यांत आलेले होते. त्यातही कार्यपध्दती अशी आहे की, संबंधित शिक्षण संस्थांच्या कार्यालयातून देयके ही सादर केली जातात व त्या देयकातूनच भविष्य निर्वाह निधीच्या हप्त्याच्या संदर्भामध्ये उल्लेख असतो त्यानंतर शिक्षण निरिक्षक कार्यालयातून दरवर्षी भविष्य निर्वाह निधी विवरणपत्र पाठविले जाते. त्या पत्राच्या छायांकित प्रती हया त्या महाविद्यालयाच्या किंवा शाळेच्या आस्थापना विभागाकडे असतात व त्या प्रत्येक संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांना दिल्या जातात व त्यांच्या सहया घेतल्या जातात त्यानंतर एक महिन्याच्या आत त्या त्रुटी असल्यास त्या त्रुटीच्या सूचना देणे अनिवार्य असते व त्यास वेळोवेळी सूचना जर संबंधित कर्मचा-याकडून आल्या तरी त्यामध्ये योग्यत्या दुरुस्त्या करता येतात. परंतू तशा सूचना न आल्यास दिलेले विवरण बरोबर आहे असे गृहीत धरले जाते त्यात काही त्रुटी व तफावत

करुन दिलेले नाही व त्याज कोण देणार या संदर्भातील तक्रारी ज्या आहेत त्यासाठी संबंधिताची जबाबदारी निश्चित ठरविली जाणे आवश्यकता आहे त्याकरिता सर्व अपिलकर्ता यांनी स्वतंत्रपणे तक्रार करणे आवश्यक आहे. माहितीच्या अधिकारात कार्यालयाकडे असलेले विवरण पत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध होतात. परंतू १५,००० च्या आसपास कर्मचारी आहेत व त्या सर्वानी अशा प्रकारची माहिती मागितल्यास ती उपलब्ध करुन देणे आवश्यक असले तरी त्यास दैनंदिन कामकाज सांभाळून ती उपलब्ध करुन देण्यास विलंब होऊ शकतो व त्यामुळेच सर्व अपिलार्थी यांनी निरिक्षण करुन नोंदी घ्याव्यात असे कळविलेले होते. त्याप्रमाणे त्यांना निरिक्षण देण्यांत आलेले आहे. तरी सुध्दा आयोगाने आदेश केल्यास सन २००० पासून आतापर्यंतचे विवरण पत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्या जातील व पूर्वीच्या वर्षाच्या संदर्भामध्ये ज्या ज्या कर्मचारी संदर्भात ledger Book उपलब्ध असेल त्यांच्या छायांकित प्रती काढता येत असतील तर त्या छायांकित प्रती काढून देण्यांत याव्यात. मात्र जिर्ण कागदपत्र असतील तर त्यांनी त्यांच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.

त्यावर पुन्हा अपिलकर्ता यांनी आयोगापुढे त्यांचे म्हणणे लेखी मांडलेले आहे व त्यांना ज्या ज्या अधिका-यांनी त्या त्या वेळच्या नोंदी घेतलेल्या नसतील त्याकरिता त्यांचे विरुध्द शस्ती लादण्यांत येईल अशी विनंती केलेली आहे. निरिक्षण केलेल्या व छायांकित प्रती उपलब्ध करुन देऊ असे म्हटले तरी त्या उपलब्ध करुन दिलेल्या नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची देखील त्यांनी दाखल घेतलेली नाही व त्यानंतर सुध्दा जे उत्तर दिलेले आहे ते जन माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे असे आयोगाच्या निदर्शनास आणलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ही सर्व माहिती महाविद्यालयात किंवा शाळामध्ये उपलब्ध असते व ती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांच्याकडून उपलब्ध होऊ शकते. परंतू अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना प्राचार्याकडे माहितीचा अर्ज करणे आपसांमध्ये योग्य वाटत नाही.

वरील प्रकरणी दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर अपिलकर्ता यांचे सुध्दा विवरण मिळाल्यानंतर त्यामध्ये त्रुटी आहेत किंवा नाही हे तपासून पाहणे त्याप्रमाणे सूचना करणे ही त्यांची जबाबदारी आहेच व त्याप्रमाणे जर तश त्रुटी तपासून सूचना केलेल्या नसतील तर त्याबाबत कोणत्याही कर्मचारी तथा अधिका-यास जबाबदार धरता येणार नाही तसेच प्राचार्य किंवा मुख्याध्यापक यांच्याकडे माहिती मागणार नाही हे म्हणणे हे योग्य नाही. जर माहिती महाविद्यालयात व शाळेत उपलब्ध असेल तर ती अपिलकर्ता यांच्याकडे सुध्दा असली तरी शिक्षण उपसंचालक, यांच्या कार्यालयाने देण्यास हरकत नाही व त्याप्रमाणे त्यांनी निरिक्षण केलेले आहे. माहितीचा अधिकारी २००५ च्या कलम २ (त्र)अन्वये माहितीचा अधिकारी या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरण नियंत्रणात असलेली व अधिनियमाप्रमाणे पुरविता येण्याजोगी माहितीच्या संदर्भामध्ये एखादे काम दस्तऐवज,अभिलेख,पाहणी करणे व दस्त्ऐवजाच्या किंवा अभिलेख्याची तपासणी करणे,उतारे किंवा प्रमाणीत प्रती घेणे, अश्‍ी तरतूद आहे व त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी निरिक्षण केले असले तरी ते अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे आहे. कारण निरिक्षणानंतर

**छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या नियम ५ प्रमाणे निरिक्षणाचा नियम करण्यांत आलेला आहे व त्या निरिक्षणाच्या नियमाप्रमाणे फी आकारावयाी आहे. परंतू ती कार्यपध्दती पाळली गेलेली दिसत नाही व निरिक्षणाअंती छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे आता मात्र त्या छायांकित प्रती यासर्व अपिलार्थी यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्यांत याव्यात. तसेच जुने व जिर्ण ledger Book असले तरी त्या बाबतचे निरिक्षण घेणे शक्य असल्यास त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे योग्य राहील. निरिक्षणाच्या संदर्भामध्ये अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे कार्यवाही केलेली असल्यामुळे तसेच माहिती ही अपिलकर्ता यांचेकडे सुध्दा नियमाप्रमाणे असणे अपेक्षित असल्यामुळे व महाविद्यालय/शाळेमध्ये सुध्दा ती उपलब्ध असते त्यामुळे शास्तीचा विचार करता येणार नाही असे असले तरी सर्व अपिलार्थी यांचे अपिले अंशतः मान्य करण्यास पात्र आहेत.**

*---आदेश---*

**१. अपिलकता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यांत येत असून सर्व अपिलार्थी यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५दिवसाचे आत सन२००० पासून ते आतापर्यतचे भविष्य निर्वाह निधीचे विवरणपत्राच्या छायांकित प्रती व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यांत याव्यात. त्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी दररोज शक्य असेल तेवढया लेख्याचे निरिक्षण करुन अपिलार्थी यांना विनामूल्य माहिती पुरवावी.**

**२. जन माहिती अधिकारी यांना कळविल्याप्रमाणे अपिलकर्ता हे उपस्थित झाल्यावर त्यांना हव्यात असलेल्या भविष्य निर्वाह निधी विवरणपत्राच्या छायांकित प्रती देण्यांत याव्यात. तसेच २००० पूर्वी पासूनचे विवरणपत्र असलेल्या संदर्भात निरिक्षण द्यावे व निरिक्षण झाल्यावर त्यांच्या छायांकित प्रती अपिलकर्ता यांना माहिती अधिकारी माहिती पुरविली असे सांक्षाकित करुन त्या पुरविण्यांत याव्यात.**

३. **अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.६/१२/२०१०** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/४९४५३-/अपील क्र.६१४९/२०१०

डॉ.शोभनाथ, अपीलार्थी
६०७,कांचन गुंगा, जेसल पार्क
भाईदर पूर्व, ठाणे ४०१ २०५

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक वेतन व भ.नि.नि.पथक
शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांचे कार्यालय,

२. जन माहिती अधिकारी तथा उत्तरवादी
शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांचे कार्यालय,

***---निर्णय---***

द्वितीय अपीलाचा दिनांक ७.८.२०१०
सुनावणीचा दिनांक ८/१२/२०१०.
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित

सर्व अपिलकर्ता यांनी अनुक्रमे दि.२१.४.२०१०, २१.४.२०१०, १९.४.२०१०, २६.६.२०१०, २२.४.२०१० ,२१.४.२०१० व २१.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांचेकडे त्यांचे पी.एफ. अकाऊंटच्या संदर्भामध्ये ledger extract मासिक ठेव/थकबाकी/व्याजाच्या संदर्भामध्ये सन १९९९ ते अर्जाच्या तारखेपर्यत व त्यापूर्वी यांना त्यांच्या संबंधित सेवेच्या संदर्भात वर्षाचा संबंध असेल त्या वर्षापासून माहिती मागितली असल्याचे दिसूनयेते. तसेच २० टक्के थकबाकीच्या करिता कोणता अधिकारी जबाबदार आहे त्यांची नावे देण्यांत यावीत अशी त्यांनी माहिती मागितलेली दिसूनयेते. सदरहू माहिती ही टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

सर्व अर्जदाराच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तथा वेतन व भविष्य निर्वाह निधी शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई यांनी दि.५.५.२०१० रोजी (काही पत्रा तारीख सुध्दा दिलेली नाही)मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये उत्तर दिलेले दिसून येते. परंतू सदर उत्तराने समाधान न झाल्यामुळे सर्व अपिलकर्ता यांनी अनुक्रमे दि.२८.८.२०१०,दि.१५.७.२०१०, दि.२८.६.२०१०,दि. २८.६.२०१०,दि.६.७.२०१०,दि.२८.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नाही. मात्र दि.२.१७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी उत्तर पाठविलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे सर्व अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिले दाखल केलेली आहेत.

सर्व अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी माहितीच्या अधिकारात जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांना ledger Book चे सन २००० पासून आतापर्यतचे निरिक्षण देण्यांत आले परंतू त्यांच्या प्रती या उपलब्ध

करुन देण्यात आलेल्या नाहीत. सन २००० पूर्वी च्या वर्षाच्या संदर्भामध्ये ज्या अर्जदाराचा संदर्भ असेल त्या अर्जदाराच्या संदर्भामध्ये **ledger** Book हे उपलब्ध नाही किंवा ते जीर्ण झालेले असल्यामुळे त्यांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन देता येणार नाही व ते गोडाऊनमध्ये आहे असे सांगितले. तसेच जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये अपिलार्थी गेले त्यावेळी त्यांना योग्य वागणूक देण्यांत येत नाही व माहितीचा अर्ज केला म्हणून त्यांची हेटाळणी केली गेली व त्यामुळेच माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती कां करण्यांत येऊ नये अशी विनंती सर्व अपिलर्थीनी केलेली आहे.

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

क्र-मुमाआ/४९४५५-/अपील क्र.६१५७/२०१०

श्री. रजेन भावसार अपीलार्थी
अ-१ शाह भुवन, एल.बी.एस मार्ग,
गंगावाडी रोड, घाटकोपर पश्चिम मुंबई ८६

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक वेतन व भ.नि.नि.पथक
शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांचे कार्यालय,

२. जन माहिती अधिकारी तथा उत्तरवादी
शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांचे कार्यालय,

***---निर्णय---***

व्दितीय अपीलाचा दिनांक ७.८.२०१०
सुनावणीचा दिनांक ८/१२/२०१०.
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित

सर्व अपिलकर्ता यांनी अनुक्रमे दि.२१.४.२०१०, २१.४.२०१०, १९.४.२०१०, २६.६.२०१०, २२.४.२०१० ,२१.४.२०१० व २१.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई पश्चिम विभाग यांचेकडे त्यांचे पी.एफ. अकाऊंटच्या संदर्भामध्ये ledger extract मासिक ठेव/थकबाकी/व्याजाच्या संदर्भामध्ये सन १९९९ ते अर्जाच्या तारखेपर्यत व त्यापूर्वी यांना त्यांच्या संबंधित सेवेच्या संदर्भात वर्षाचा संबंध असेल त्या वर्षापासून माहिती मागितली असल्याचे दिसूनयेते. तसेच २० टक्के थकबाकीच्या करिता कोणता अधिकारी जबाबदार आहे त्यांची नावे देण्यांत यावीत अशी त्यांनी माहिती मागितलेली दिसूनयेते. सदरहू माहिती ही टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

सर्व अर्जदाराच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तथा वेतन व भविष्य निर्वाह निधी शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई यांनी दि.५.५.२०१० रोजी (काही पत्रा तारीख सुध्दा दिलेली नाही)मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये उत्तर दिलेले दिसून येते. परंतू सदर उत्तराने समाधान न झाल्यामुळे सर्व अपिलकर्ता यांनी अनुक्रमे दि.२८.८.२०१०,दि.१५.७.२०१०, दि.२८.६.२०१०,दि. २८.६.२०१०,दि.६.७.२०१०,दि.२८.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नाही. मात्र दि.२.१७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी उत्तर पाठविलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे सर्व अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले दाखल केलेली आहेत.

सर्व अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी माहितीच्या अधिकारात जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांना ledger Book चे सन २००० पासून आतापर्यतचे निरिक्षण देण्यांत आले परंतू त्यांच्या प्रती या उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत. सन २००० पूर्वी च्या वर्षाच्या संदर्भामध्ये ज्या अर्जदाराचा संदर्भ असेल त्या अर्जदाराच्या संदर्भामध्ये ledger Book हे उपलब्ध नाही किंवा ते जीर्ण

झालेले असल्यामुळे त्यांच्या छांयाकित प्रती उपलब्ध करुन देता येणार नाही व ते गोडाऊनमध्ये आहे असे सांगितले. तसेच जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये अपिलार्थी गेले त्यावेळी त्यांना योग्य वागणूक देण्यांत येत नाही व माहितीचा अर्ज केला म्हणून त्यांची हेटाळणी केली गेली व त्यामुळेच माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती कां करण्यांत येऊ नये अशी विनंती सर्व अपिलर्थीनी केलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितल की, भविष्य निर्वाह निधीबाबत माहे २००० पासून ते आजातागायतचे लेखे उपलब्ध करुन देण्यांत आले होते व त्याही पूर्वी भविष्य निर्वाह निधी लेजरमध्ये घेतलेल्या मासिक वर्गणी थकबाकीचे आदेश त्यावरील व्याज इत्यादि बाबतची माहिती ज्या कालावधीत मागविण्यांत आलेली आहे त्या फार पूर्वीच्या कालावधीतील (१२वर्ष ते २६ वर्षे पूर्वीची) असल्या कारणाने सदरचे लेखे हे अत्यंत जिर्ण अवस्थेत असल्याकारणाने छायांकित प्रती वाचनीय होणार नाही, अशी दाट शक्यता आहे. तसेच जी माहिती मागविण्यांत आली आहे ती माहिती वेळोवेळी दरवर्षी भविष्य निर्वाह निधी विवरण पत्राव्दारे अर्जदारांना देण्यांत आलेली असते,असे असले तरी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची पडताळणी करण्याकरिता दि.३० जून २०१०पर्यत कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन दिली जाईल असे त्यांना कळविलेले होते. हे वेतन आराखडयानुसार भविष्य निर्वाह निधी देय पारित करुन घेऊन कर्मचा-याचा पहिला हप्ता भविष्य निर्वाह निधी मुदतीत जमा करण्याची जबाबदारीही संबंधित शाळेच्या/महाविद्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांची (मुख्याध्यापक/पाचार्य) असते. महाविद्यालयाच्या देयकात त्रुटी आढळल्याने देयक पारित झालेले नाही. सबब पहिला हप्ता जमा झालेला नाही. परंतू त्रुटींची पूर्तता त्वरीत केल्यास कार्यरत असलेल्या महाविद्यालयीन कर्मचा-यांचा पहिला हप्ता त्वरीत भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यांत येईल असेही कळविण्यांत आले होते. प्रथम अपिलाच्या नंतर सुध्दा दि.२१.७.२०१० रोजी सन २००० पासून ते २००९ पर्यत भविष्य निर्वाह निधीच्या लेख्याच्या नोंदी घेतलेल्या आहेत, लेखा वर्ष १९८४ ते २००० पर्यतच्या छायांकित प्रती जिर्ण असल्यामुळे त्याच्या छायांकित प्रती येणार नाही, अशा प्रकारे कळविण्यांत आलेले होते. त्यातही कार्यपध्दती अशी आहे की, संबंधित शिक्षण संस्थांच्या कार्यालयातून देयके ही सादर केली जातात व त्या देयकातूनच भविष्य निर्वाह निधीच्या हप्त्याच्या संदर्भामध्ये उल्लेख असतो त्यानंतर शिक्षण निरिक्षक कार्यालयातून दरवर्षी भविष्य निर्वाह निधी विवरणपत्र पाठविले जाते. त्या पत्राच्या छायांकित प्रती हया त्या महाविद्यालयाच्या किंवा शाळेच्या आस्थापना विभागाकडे असतात व त्या प्रत्येक संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांना दिल्या जातात व त्यांच्या सहया घेतल्या जातात त्यानंतर एक महिन्याच्या आत त्या त्रुटी असल्यास त्या त्रुटीच्या सूचना देणे अनिवार्य असते व त्यास वेळोवेळी सूचना जर संबंधित कर्मचा-याकडून आल्या तरी त्यामध्ये योग्यत्या दुरुस्त्या करता येतात. परंतू तशा सूचना न आल्यास दिलेले विवरण बरोबर आहे असे गृहीत धरले जाते त्यात काही त्रुटी व तफावत करुन दिलेले नाही व त्याज कोण देणार या संदर्भातील तक्रारी ज्या आहेत त्यासाठी संबंधिताची जबाबदारी निश्चित ठरविली जाणे आवश्यकता आहे त्याकरिता सर्व अपिलकर्ता

यांनी स्वतंत्रपणे तक्रार करणे आवश्यक आहे. माहितीच्या अधिकारात कार्यालयाकडे असलेले विवरण पत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध होतात. परंतू १५,००० च्या आसपास कर्मचारी आहेत व त्या सर्वांनी अशा प्रकारची माहिती मागितल्यास ती उपलब्ध करुन देणे आवश्यक असले तरी त्यास दैनंदिन कामकाज सांभाळून ती उपलब्ध करुन देण्यास विलंब होऊ शकतो व त्यामुळेच सर्व अपिलार्थी यांनी निरिक्षण करुन नोंदी घ्याव्यात असे कळविलेले होते. त्याप्रमाणे त्यांना निरिक्षण देण्यांत आलेले आहे. तरी सुध्दा आयोगाने आदेश केल्यास सन २००० पासून आतापर्यंतचे विवरण पत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्या जातील व पूर्वीच्या वर्षाच्या संदर्भामध्ये ज्या ज्या कर्मचारी संदर्भात **ledger Book** उपलब्ध असेल त्यांच्या छायांकित प्रती काढता येत असतील तर त्या छायांकित प्रती काढून देण्यांत याव्यात. मात्र जिर्ण कागदपत्र असतील तर त्यांनी त्यांच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.

त्यावर पुन्हा अपिलकर्ता यांनी आयोगापुढे त्यांचे म्हणणे लेखी मांडलेले आहे व त्यांना ज्या ज्या अधिका-यांनी त्या त्या वेळच्या नोंदी घेतलेल्या नसतील त्याकरिता त्यांचे विरुध्द शस्ती लादण्यांत येईल अशी विनंती केलेली आहे. निरिक्षण केलेल्या व छायांकित प्रती उपलब्ध करुन देऊ असे म्हटले तरी त्या उपलब्ध करुन दिलेल्या नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची देखील त्यांनी दाखल घेतलेली नाही व त्यानंतर सुध्दा जे उत्तर दिलेले आहे ते जन माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे असे आयोगाच्या निदर्शनास आणलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ही सर्व माहिती महाविद्यालयात किंवा शाळामध्ये उपलब्ध असते व ती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांच्याकडून उपलब्ध होऊ शकते. परंतू अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना प्राचार्याकडे माहितीचा अर्ज करणे आपसांमध्ये योग्य वाटत नाही.

वरील प्रकरणी दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर अपिलकर्ता यांचे सुध्दा विवरण मिळाल्यानंतर त्यामध्ये त्रुटी आहेत किंवा नाही हे तपासून पाहणे त्याप्रमाणे सूचना करणे ही त्यांची जबाबदारी आहेच व त्याप्रमाणे जर तश त्रुटी तपासून सूचना केलेल्या नसतील तर त्याबाबत कोणत्याही कर्मचारी तथा अधिका-यास जबाबदार धरता येणार नाही तसेच प्राचार्य किंवा मुख्याध्यापक यांच्याकडे माहिती मागणार नाही हे म्हणणे हे योग्य नाही. जर माहिती महाविद्यालयात व शाळेत उपलब्ध असेल तर ती अपिलकर्ता यांच्याकडे सुध्दा असली तरी शिक्षण उपसंचालक, यांच्या कार्यालयाने देण्यास हरकत नाही व त्याप्रमाणे त्यांनी निरिक्षण केलेले आहे. माहितीचा अधिकारी २००५ च्या कलम २ (त्र)अन्वये माहितीचा अधिकारी या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरण नियंत्रणात असलेली व अधिनियमाप्रमाणे पुरविता येण्याजोगी माहितीच्या संदर्भामध्ये एखादे काम दस्तऐवज,अभिलेख,पाहणी करणे व दस्त्ऐवजाच्या किंवा अभिलेख्याची तपासणी करणे,उतारे किंवा प्रमाणीत प्रती घेणे, अशी तरतूद आहे व त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी निरिक्षण केले असले तरी ते अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे आहे. कारण निरिक्षणानंतर छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या नियम ५ प्रमाणे निरिक्षणाचा नियम करण्यांत आलेला आहे व त्या निरिक्षणाच्या

**नियमाप्रमाणे फी आकारावयाची आहे. परंतू ती कार्यपध्दती पाळली गेलेली दिसत नाही व निरिक्षणाअंती छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे आता मात्र त्या छायांकित प्रती यासर्व अपिलार्थी यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्यांत याव्यात. तसेच जुने व जिर्ण ledger Book असले तरी त्या बाबतचे निरिक्षण घेणे शक्य असल्यास त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे योग्य राहील. निरिक्षणाच्या संदर्भामध्ये अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे कार्यवाही केलेली असल्यामुळे तसेच माहिती ही अपिलकर्ता यांचेकडे सुध्दा नियमाप्रमाणे असणे अपेक्षित असल्यामुळे व महाविद्यालय/शाळेमध्ये सुध्दा ती उपलब्ध असते त्यामुळे शास्तीचा विचार करता येणार नाही असे असले तरी सर्व अपिलार्थी यांचे अपिले अंशतः मान्य करण्यास पात्र आहेत.**

*---आदेश---*

**१९.अपिलकता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यांत येत असून सर्व अपिलार्थी यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५दिवसाचे आत सन२००० पासून ते आतापर्यतचे भविष्य निर्वाह निधीचे विवरणपत्राच्या छायांकित प्रती व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यांत याव्यात. त्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी दररोज शक्य असेल तेवढया लेख्याचे निरिक्षण करुन अपिलार्थी यांना विनामूल्य माहिती पुरवावी.**

**२०. जन माहिती अधिकारी यांना कळविल्याप्रमाणे अपिलकर्ता हे उपस्थित झाल्यावर त्यांना हव्यात असलेल्या भविष्य निर्वाह निधी विवरणपत्राच्या छायांकित प्रती देण्यांत याव्यात. तसेच २००० पूर्वी पासूनचे विवरणपत्र असलेल्या संदर्भात निरिक्षण द्यावे व निरिक्षण झाल्यावर त्यांच्या छायांकित प्रती अपिलकर्ता यांना माहिती अधिकारी माहिती पुरविली असे सांक्षाकित करुन त्या पुरविण्यांत याव्यात.**

२१. **अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.८/१२/२०१०** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/४९२७७-/अपील क्र.६०३३/२०१०
क्र-मुमाआ/४९२८०-/अपील क्र. ६०३६/२०१०
क्र-मुमाआ/४९२८०-/अपील क्र. ६०३७/२०१०
क्र-मुमाआ/४९२८०-/अपील क्र.६०३८/२०१०

श्री. प्रमोद लक्ष्मण कदम — अपीलार्थी
१६, डी-२/वर्सोवा, अंधेरी श्री.साई को.ऑ.हौ.सो.
एस.व्ही.पी.नगर म्हाडा अंधेरी पश्चिम मुंबई ५३

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबधंक सहकारी संस्था
गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व मुंबई-५१

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासक — उत्तरवादी
गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व मुंबई-५१

***---निर्णय---***

चारही व्दितीय अपीलाचा दिनांक २८.७. २०१०
सुनावणीचा दिनांक ९/१२/२०१०.
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित

२. अपिलकर्ता यांनी अंधेरी श्री.साई को.ऑ.हौ. सोसायटी वर्सोवा यांचेकडे अनुक्रमे दि.१.१२.२०१०,९.६.२००९,९.६.२००९, ११.७.२००९ अर्जाव्दारे माहिती मागितली असल्याचे दिसून येते.

३. या सर्व अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि. ११.४.२०१० रोजी ४ प्रथम अपिले दाखल केली.चारही प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे ४ व्दितीय अपिले दाखल केलेली आहेत.

४. अपिलकर्ता यांनी आयोगाकडे युक्तीवाद करताना असे सांगितले की, सहकारी संस्थांवर प्रशासक नियुक्ती करण्यांत आल्यानंतर प्रशासक हा कोणत्याही प्रकारची माहिती देत नाही व प्रशासक हा माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केलेला नाही. असे सांगितले जाते. त्यामुळे उपनिबधंक हे प्रथम अपिलीय अधिकारी नाही असेही सांगण्यांत येते. उपनिबंधकाकडे संस्थेची माहिती मागितली तर तीही उपलब्ध करुन दिली जात नाही व त्यामुळे संस्थेकडून कोणत्याही प्रकारची माहिती सभासदांना मिळत नाही म्हणून माहितीच्या अधिकारात हा अर्ज दिलेला होता त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडून आयोगापुढे खुलासा करण्यांत आलेला आहे. उपनिबंधकाकडील सर्व अपिलामध्ये मुळ माहिती अर्ज हे प्रशासक हयांचे कडे केलेले आहेत परंतू प्रशासक जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केलेले नाही व कोणत्याही प्रशासकास जन माहिती अधिकारी म्हणून या कार्यालयामार्फत नियुक्त करण्यांत येत नाही, असे कळविले आहे. अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती ही संस्थेच्या स्तरावरील आहे. अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती ही या कार्यालयाच्या अभिलेख्याचा भाग होत नाही व त्यामुळेच दि.१७.५.२०१० रोजीच्या पत्रान्वये संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेचे प्रथम अपिलीय अधिकारी हे कार्यालय नाही असे कळवून प्रथम अपिले दप्तर दाखल करण्यांत आलेली आहेत व त्यामुळेच व्दितीय अपिल दखल घेण्या योग्य नसल्यामुळे दत्परी

दाखल करुन निकाली काढण्याची कार्यवाही होण्याबाबत विनंती आयोगापुढील लेखी खुलाशात दिलेली आहे.

५. प्रथम अपिलीय अधिकारी उपबिनंधक यांचा खुलासा तांत्रिकदृष्टया योग्य असला तरी प्रशासक नियुक्ती ही उपनिबंधक यांच्या आदेशामुळेच होते, याचाच अर्थ प्रशासकावर सर्व नियंत्रण हे उपनिबंधक यांचे असते व अशा परिस्थितीमध्ये प्रशासकाकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन ती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे हे "माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) मधील "माहिती" या संज्ञेच्या व्याख्ये प्रमाणे सुसंगत आहे. "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये कोणत्याही असा असून त्यामध्ये अभिलेखे, दस्तऐव, ज्ञापने, इ-मेल, अभिप्राय, सूचना प्रसिध्दी पत्रक, परिपत्रके, आदेश. रजिस्टर्स, संविदा अहवाल कागदपत्रे नमूने,प्रतीमाने, कोणत्याही इलेक्ट्रॉनिक्स सामुग्री, आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती याचा समावेश होतो. "

६. यावरुन सार्वजिनिक प्राधिकरण म्हणजे निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, अन्य कोणत्याही कायद्यान्वये म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व खाजगी निकाय याचा अर्थ सहकारी संस्था असा घेतल्यास उपनिबधंकांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतूदीप्रमाणे सहकारी संस्थेची माहिती जी उपलब्ध करुन घेता येते त्या माहितीचा सुध्दा समावेश " माहिती " या व्याख्येत मध्ये होतो. त्यामुळे ती अर्जदारास पुरविणे बंधनकारक आहे. त्यामुळे ज्या ज्या वेळेस अर्जदार हे जन माहिती अधिकारी म्हणून उपबिनंधक यांचे कार्यालयात सहकारी संस्थेची माहिती मागतात त्या त्या वेळेस त्या सहकारी संस्थेकडून किंवा प्रशासकाकडून जी माहिती उपलब्ध करुन घेता येईल ती माहिती त्यांना पूरविणे व जी माहिती उपलब्ध करुन घेता येत नाही असे कळविणे आवश्यक असते. सदरहूं प्रकरणामध्ये मागितलेली माहिती आहे ती प्रथम अपिलीय अधिकारी यांचेदृष्टीने तांत्रिकदृष्टया म्हणण्यानुसार देणे योग्य असले तरी कोणत्याही प्रकारे सभासदानी मागितलेल्या माहितीचा संबंध नाही हे म्हणणे योग्य नाही व यापुढे उपनिबंधक, सहकारी संस्था या कार्यालयाने याबाबत सूचना काढणे आवश्यक आहे. जेणेकरुन सहकारी संस्थेच्या सभासदांना सहकारी संस्थेची माहिती उपलब्ध करुन देता येईल त्याकरिता उपनिबंधक यांनी प्रशासकांना आदेश करुन माहिती उपलब्ध करुन देणे किंवा प्रशासकाकडून माहिती उपलबध करुन घेऊन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता चारही अपीले ही मंजूर करण्यास पात्र आहेत.

---*आदेश*---

१. अपिलकता यांची चारही अपिले मंजूर करण्यांत येऊन उपनिबंधक यांनी प्रशासकास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश द्यावेत.

२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई

दि.८/१२/२०१० (विलास पाटील)

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी

राज्य माहिती आयोग, मुंबइ

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/४९४५०-/अपील क्र.६०४५/२०१०**

**श्री. ॲड नरेंद्र बी. देशमुख, अपीलार्थी**
**३१४/७, नॉर्थ होऊस, गोरेगांव पश्चिम**
**रोड नं.१७, मुंबई ६२**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक म्युनिसिपल कमिशनर**
**पी/साऊथ वॉर्ड,म्युनिसिपल कार्पोरेशन ऑफ ग्रेटर,**
**मुंबई, मिठा नगर, गोरेवगांव पश्चिम मुंबई ६२**

**२. जन माहिती अधिकारी तथा उपकर निर्धारक व**
**संकलक जी/साऊथ,साऊथ वॉर्ड समाज मंदिर उत्तरवादी**
**उन्नत नगर, पार्ट-I एम.जी.रोड, गोरेगांव पश्चिम, मंबई १०४**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक ९.९.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १०/१२/२०१०.**
**अपीलार्थी उपस्थित. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

**२. अपिलकर्ता यांनी दि.२.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी उपकर निर्धारक व संकलक जी साऊथ वॉर्ड यांचेकडे पुढीलप्रमाणे माहिती मागितली होती :-**

**A) What are the Names & address of all the person who are jointly & senerally liable for the payments of the B.M.C. property taxes persently as per the latest record aintained by the B.M.C. in respect of the LAND bearing the C.T.S.No.431[ Mouje Pahadi[ Village[ taluka Borivli, Mumbai suburban district bearing the PLOT NO.314 JOY HOUSE JAWAHAR NAGAR GOREGAON (WEST) MUMBAI 400062**

**B) Inspecton of the Records & certified true copy thereof is also resuested by the provision of the secton 2(f)(g)(h)(I)(l) of the RTI ACT 2005 R/W the section 3,4,7,(1)of the said Act.**

**३. सदरच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१७.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू सदरच्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.१३.७.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये माहिती प्राप्त झाल्यामुळे अपिल अर्ज निकाली काढण्यांत येतो, असे निर्णय दि.२१.८.२०१० रोजी देण्यात आलेला आहे व त्यानंतर अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.**

**४. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलकर्ता यांना जी माहिती दि.१७.६.२०१० रोजी उपलब्ध झाली ती अपूर्ण आहे. मालमत्ता कर देयकाची प्रत त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू त्यामध्ये पोट भाडेकरु श्री. बेचारभाई पटेल यांचा पत्ता आहे परंतू श्री.बेचारभाई पटेल हे भारतात नाहीत व त्यांना जवाहर नगर को.हो.सोसायटीने भाडेकरु म्हणून दिलेले होते व मुळ मालक हे श्री. दोसीबाई नानाभोय भायरांजी जीजीभाई हे आहेत. त्यामुळे सदरील मालमत्तेचा कर कोण भरतो व त्यांचे पत्ते काय आहेत अशी माहिती त्यांनी मागितलेली होती. परंतू सदरच्या मालमत्त्ेचे मालक यांचा पत्ता त्यामध्ये उपलब्ध करुन दिलेला आहे व त्यामध्ये कराचा भरणा कोण करीत आहे याबाबत काहीही माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही. त्यांनी**

अभिलेख्याचे निरिक्षण केले व अभिलेख्याच्या निरिक्षणामध्ये कर देयक जे मिळालेले आहे त्या करदेयकाची स्वंतत्रपणे यादी मुळमालकाच्या निवासाचा पत्ता आढळून येत नाही. त्यामुळे सदरची माहिती त्यांना अपूर्ण मिळालेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. पुढे युक्तीवाद करताना असेही सांगितले की, माहितीचा अधिकार २००५ च्या तरतूदीप्रमाणे माहिती जशी आहे तशी उपलब्ध होत हे जरी खरे असलेतरी कर देयकाच्या संदर्भामध्ये जर कर भरणा करावयाची नोटीस काढावयाची असेल तर त्यावर पत्ता असणे आवश्यक आहे. व त्यावर पत्ता नसल्यास कर देयका नोटीस काढता येणार नाही व कराचा भरण सुध्दा होणार नाही व त्यामुळे कर देयकावर पत्ता असणे जरुरीचे आहे व जन माहिती अधिकारी यांनी पूर्ण माहिती आहे तशी उपलब्ध दिली असे सांगितले असले तरी त्यांच्याकडे सदर देयकाच्या संदर्भामध्ये मुळ मालकाचा पत्ता त्यांना उपलब्ध करुन द्यावा किंवा मुळ मालकाचा पत्ता त्यांचेकडे उपलब्ध नाही अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र त्यांनी आयोगाकडे सादर करावे.

५. माहितीचाअधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (त्र) प्रमाणे 'माहिती ' या संज्ञेचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असून त्यामध्ये अभिलेख,दस्तऐवज,ज्ञज्ञपने, ई-मेल, अभिप्राय, सूचना प्रसिध्दी पत्रके, आदेश रोजवहया, संविदा अहवाल, कागदपत्रे इत्यादिचा समावेश होतो.

(त्र) ' माहितीचा अधिकार ' प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली माहिती (१) एखादे काम, दस्तऐवज अभिलेख यांची पहाणी करणे (२) दस्तऐवजाच्या किंवा अभिलेख्यांच्या टिपणी उतारे किंवा प्रमाणित प्रती देणे इत्यादि.

यावरुन माहिती कागदपत्राच्या स्वरुपात जशी आहे तशी उपलब्ध होते. कारवाई करुन मागणे अपेक्षित नाही. माहिती उपलब्ध झाल्यावर त्यात अनियमितता असेल तर स्वतंत्रपणे सक्षम अधिकारी यांचेकडे तक्रार करणे अशी कार्यपध्दतीतून कारवाई करुन घेता येईल.

६. जन माहिती अधिकारी हयांना त्यांच्या दि.१२.१२.२०१० रोजी पूर्वनियोजित बैठकीत उपस्थित रहावयाचे असल्याने आयोगातील दि.१०१२.२०१० रोजीची सुनावणी पुढे ढकलण्याबाबत विनंती केलेली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेता आलेले नाही. त्यामुळे सदरच्या अपिलाबाबत अंतरिम आदेश काढणे संयुक्तिक राहिल.

## अंतरिम आदेश

१.अपिलकर्ता यांचे विनंतीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी मालमत्ता संदर्भामध्ये मूळमालकाच्या निवासाचा पत्ता हा त्यांच्याकडे उपलब्ध असल्यास तो उपलब्ध करुन देण्यात यावा किंवा उपलब्ध नसल्यास त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र आयोगाकडे दि.१०.१.२०१० रोजी सादर करावे अन्यथा शास्ती लादण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.
२२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.१०/१२/२०१० (विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबइ

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/४९४५०-/अपील क्र.६०३२/२०१०**

**श्री.नारायण भिकाजी परब व इतर** **अपीलार्थी**
**१७२/ब/५७५५, वंदे पुष्पा को.ऑ.हौ.सो.(मर्यादित)**
**कन्नमवार नगर-१ विक्रोळी पूर्व, मुंबई ८३**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**मिळकत व्यवस्थापक-३ यांचे कार्यालय, म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वाद्रे पूर्व, मुंबई ५१**

**२. जन माहिती अधिकारी तथा** **उत्तरवादी**
**मिळकत व्यवस्थापक-३ यांचे कार्यालय, म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वाद्रे पूर्व, मुंबई ५१**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक २.८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक ९/१२/२०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

**अपिलार्थी यांनी माहिती मिळालेली असलयामुळे व कोणतीही तक्रार राहिलेली नसल्यामुळे अपिल मागे घेत आहे असे आयोगास लेखी दिलेले असल्यामुळे सदाचे अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

मुंबई
**दि.१०/१२/२०१०** **(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/४९२७४-/अपील क्र.६०३१/२०१०

श्री.नारायण भिकाजी परब व इतर — अपीलार्थी
१७२/ब/५७५५, वंदे पुष्पा को.ऑ.हौ.सो.(मर्यादित)
कन्नमवार नगर-१ विक्रोळी पूर्व, मुंबई ८३

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपनिबधंक सहकारी संस्था, म्हाडा,
गृहनिर्माण भवन, वाद्रे पूर्व, मुंबई ५१

२. जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी
उपनिबधंक सहकारी संस्था, म्हाडा,
गृहनिर्माण भवन, वाद्रे पूर्व, मुंबई ५१

---*निर्णय*---

व्दितीय अपीलाचा दिनांक २.८.२०१०
सुनावणीचा दिनांक ९/१२/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिलकर्ता यांनी दि.५.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचेकडे दि.९.२.२०१० रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(१)अन्वये दिलेले आदेश जावक क्र.उपनि/संस/मुंम/४४७/२०१० केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात तसेच प्रशासक यांनी केलेल्या कार्यवाहीच्या पत्रव्यवहाराच्या संदर्भात एकूण ७ मुद्यामध्ये माहिती मागितली असल्याचे दिसून येते. सदर प्रत व्यक्तिश:देण्यांत याव्यात असे नमूद केलेले दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१८.५.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.२१.६.२०१० रोजी देण्यांत आला असून १५ दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतू त्यांनतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगकडे व्दितीय अपिल दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रशासकास माहिती मागितली तर प्रशास माहिती देत नाहीत. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक यांच्याकडे माहिती मागितली तरी सुध्दा माहिती उपलब्ध होत नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ३२ प्रमाणे सुध्दा माहिती मागितली तरी सुध्दा प्रशासक ती माहिती देत नाहीत व उपलनिबंधकाकडे तक्रार केली असता उपबिनंधक हे त्या तक्रारीची दखल घेत नाही व त्यामुळे माहितीच्या अधिकारात अर्ज केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रशासकाकडून माहिती उपलब्ध होत नाही व त्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. परंतू ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय देताना विचारात घेतली असल्याचे दिसून येते. उपनिबधंक, सहकारी संस्था यांना सूपर्ण महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम या तरतूदीच्या अंमलबजावणीचे निश्चितच ज्ञान आहे व त्यामुळे त्यांनी जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयाप्रमाणे १५ दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते.  परंतू जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी नं.१ मुंबई यांनी कार्यालयातील माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून

येत आहेत व त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम २० (१)अन्वये शास्ती लादणे् आवश्यक आहे. शास्ती बद्दलचे त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचेकडे भरपूर काम आहे तसेच पद रिक्त आहेत व त्यामुळे रिक्त पदाचे काम सुध्दा त्यांना करावे लागते. परंतू असे असले तरी अर्जदाराच्या संदर्भात त्यांनी ३० दिवसांत योग्यती प्रक्रियाकरुन माहिती देणे बंधनकारक असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा खुलासा समाधानकारक नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांस पात्र आहे.

## आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-१ मुंबई मंडळ,मुंबई यांनी अपिलकर्ता यांचे दि.५.४.२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे निर्णयातील आदेशाप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसलयामुळे अधिनियमाच्या कलम २०(१)प्रमाणे रुपये १०००/- शास्ती लादण्यांत येत असून शास्तीची रक्कम पुढील लेखाीशिर्षाखाली जमा करावी.

" लेखाशिष क्र.००७- इतर प्रशासनिक सेवा
६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा (१८)
माहितीचा अधिकार (००७००१६-१) "

२ सदर शास्तीची वसूली ही उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई गृहनिर्माण विकास महामंडळ यांनी करावयाची आहे.

३ अपिलकर्ता यांच्या दि.५.४.२०१० रोजीच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत विनामूल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यांत यावी. त्याकरिता अपिलकर्ता यांनी हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसात जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१ मुंबई विभाग यांचे कडे संपर्क साधून सदरची माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी.अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.१०/१२/२०१०

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबइ

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/४९६३२-/अपील क्र.६०४८/२०१०**

**सौ.साईप्रिया नामदेव मळीक** **अपीलार्थी**
**११/५५३ सरदर नगर नंबर-१**
**सरदार नगर पीपल को.ऑप.हौ.सो.लि.**
**सायन, कोळीवाडा, मुंबई २२**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी (मुंबई मंडळ)**
**तथा मिळकत व्यवस्थापक-२,म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वाद्रे पूर्व, मुंबई ५१**

**२. जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-५(मुं.म.)** **उत्तरवादी**
**म्हाडा,गृहनिर्माण भवन, वाद्रे पूर्व, मुंबई ५१**

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक ७.९..२०१०
सुनावणीचा दिनांक १०/१२/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित. अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.१.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (५) यांच्याकडे सोसायटीला इमारतीच्या दोन्ही बाजूला असलेल्या मोकळया जागेवर अनधिकृत बांधकाम करुन ती जागा भाडेतत्वावर देण्याची परवानगी दिली आहे काय, या संदर्भात त्यांनी व इतर तपशिलवार माहिती मागितली असल्याचे दिसून येते. माहितीचा कालावधी दि.२१.१.२००८ ते २९.४.२०१०पर्यत आहे. त्या संदर्भात श्री. जाधव, जन माहिती अधिकारी यांचेवर रुपये २५००/-एवढी शास्ती लादण्यांत आलेली परंतू म्हाडा प्रशासनामार्फत भाडे वसुली कर श्री.व्ही.के.देसाई यांच्यावर कोणती कार्यवाही करण्यांत आली व त्या संदर्भात ६ मुद्यांवर माहिती मागितलेली असल्याचे दिसून येते. सदररची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही. प्रथम अपिल दि.२१.८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या अनुषंगाने दि.२४.८.२०१० रोजी मिळकत व्यवस्थापक-५, मुंबई मंडळ यांचे उपमुख्य अधिकारी यांनी दि.२०.८.२०१०अन्वये या कार्यालयातून माहिती उपलब्ध करुन घेण्यास कळविले आहे. त्या अनुषंगाने संबंधित कर्मचारी महासंघ यांचेकडून याबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध करुन घेण्यांत येत असून ती उपलब्ध झाल्यानंतर त्यांस कळविण्यांत येईल. त्यात आपण मागणी करीत असलेले रु.३०००/- ची माहिती या कार्यालयात जमा केल्याचे दिसून येत नाही त्यांच्या छायाप्रती उपलब्ध असल्यास सादर करण्यांत याव्यात, ही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, सन २००० साली त्यांचे रुमच्या बाजूचे अनधिकृत बांधकाम तोडून ते सामान भाडे वसूली कार्यालयात ठेवले होते व सन २००० साली भाडे वसूलीकार श्री.श्री.व्ही.के.देसाई यांनी लोखंडी साहित्याचे भाडे वसुली केली आहे अशी खोटी माहिती दिली आहे. त्याकरिता प्रथम अपिल दाखल केल्यानंतर अपिल मान्य करुन खोटी माहिती दिली म्हणून रुपये २५००/- ची

शास्ती लादण्यांत आली होती. सदरची माहिती सर्व विभागातून मागितलेली आहे परंतू त्यांना ती माहिती उपलब्ध झालेली नाही.

५. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलाची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही व आदेश फक्त दिलेले आहेत. परंतू प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन त्यांना वेळेत माहिती उपलब्ध होईल अशा प्रकारे निर्णय देणे आवश्यक असते. माहिती उपलब्ध करुन द्यावययाची आहे याबाबत जन माहिती अधिकारी यांना सुध्दा ज्ञान असते व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे निर्णय आदेश पारित करुनही माहिती मात्र उपलब्ध करुन दिली जात नाही.

६. मिळकत व्यवस्थापक यांनी दि.३०.१०.२०१० रोजी एक ज्ञापन काढलेले दिसून येते व त्या ज्ञापनात जप्त केलेले लोखंडी सामान सरदार नगर क्र.१ च्या महासंघाचे सचिव री.बागवे यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या कार्यालयात जप्त केलेले लोखंडी सामान ठेवण्यांत आले आहे असे नमूद केले आहे. सदर बाब या कार्यालयाच्या निर्देशनास आणून देणे जरुरीचे होते तरी यापुढे अशी चुक करु नये अन्यथा आपणावर मंडळाच्या नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यांत येईल असे ज्ञापनात म्हटल्याचे दिसून येते व त्या ज्ञापनाची प्रत ही अपिलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे मुद्देनिहाय माहिती ही दिलेली दिसून येत नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहितीअधिकारी यांनी विहित मुदतीत मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचे विरुध्द रुपये ५००/- इतकी शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतू तत्कालीन जन माहिती अधिकारी हे आयोगापुढे सुनावणीस उपस्थित झाले नसल्यामुळे शास्तीच्या संदर्भामध्ये त्यांचे म्हणणे माहितीचा अधिनियम कलम २० (१)ऐकून घेणे हे बंधनकारक असल्यामुळे सदर अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१.अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांचे दि.७.९.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करन दिली नाही अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१)प्रमाणे रु.५०००/- एवढी शास्ती लादण्यांत कां लादण्यांत येऊ नये याबाबत त्यांचे म्हणणे त्यांनी आयोगाच्या समक्ष येऊन मांडावे. अन्यथाशास्ती कायम करण्यांत येऊन त्यांचे दरमहाच्या वेतनातून त्याची वसूली करण्याचे आदेश देण्यांत येतील. सदरील निर्णय हे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अवलोकित करावेत**

**२. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांचे दि.३०.६.२०१० रोजीच्या अर्जातील एकूण ६ मुद्यांवरील माहितीच्या छायांकित प्रती हे निर्णय मिळाल्यापसून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी, तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे सुध्दा शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी..**

**४.अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.१०/१२/२०१०** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

Kj/dec 2010

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्र-मुमाआ/४९६४८-/अपील क्र.६०४७/२०१०

श्री.शंभू सक्सेना, अपीलार्थी
पुष्पा सायकल मार्ट, संत सावता मार्ग,
ऑफ रे रोड स्टेशन, ऑन ब्रिज,
माझगांव, मुंबई १०

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त
टी विभाग, मनपा, लाला देवी दयाल मार्ग,
मुलूंड पश्चिम, मुंबई ८०

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारत व कारखाने) उत्तरवादी
टी विभाग, मनपा, लाला देवी दयाल मार्ग,
मुलूंड पश्चिम, मुंबई ८०

---*निर्णय*---

द्वितीय अपीलाचा दिनांक १३.८.२०१०
सुनावणीचा दिनांक १०/१२/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, टी विभाग, मुलूंड यांचेकडे दि.२०.२.२०१० रोजी अवैध बांधकामा संदर्भामध्ये टी विभागाने काय कार्यवाही केली आहे तसेच अपिलकर्ता यांचे दि.१.४.२०१० च्या पत्रावर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे. सदर माहिती पोष्टाने घेणार असे नमूद केले आहे. सोबत दि.१.४.२०१० रोजी दिलेल्या पत्राची प्रत सोबत जोडलेली दिसून येते. परंतू अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.२५.५.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू त्यांना मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.९.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निणर्य दि.९.७.२०१० रोजी देण्यांत आला असून जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारत व कारखाने) यांनी प्रश्नोत्तराने माहिती दिली आहे. अपिलकर्त्यास आवश्यक असलेले कागदपत्र, पुरावे विनामुल्य १० दिवसांत देण्यांत यावेत असे आदेश काढून अपिल 'अमान्य ' करुन निकाल काढलेला आहे. मात्र त्यानंतर कोणतीही माहिती दिलेली दिसून येत नाही. त्यामुळे अपिलर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी पत्रामध्ये एकूण अवैध बांधकामाच्या संदर्भामध्ये कारवाई करण्याबाबतच्या तक्रारी केलेल्या होत्या. परंतू जे उत्तर त्यांना दिलेले आहे ते विलंबाने ६ दिवसांने उशिरा दिलेले आहे. तसेच माहिती अपूर्ण दिलेली आहे. इतर मुद्यांच्या संदर्भामध्ये कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या काही मुद्यांच्या संदर्भामध्ये केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेले आहे व उर्वरित तक्रारीच्या संदर्भात योग्य त्या कालावधीत कारवाई करण्यांत येईल असे कळविण्यांत आलेले आहे. अपिलकर्ता यांनी दाखल केलेले पत्र, माहितीचा अर्ज व दिलेले उत्तर याचे अवलोकन केले असता माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेले आहे परंतू ती विलंबाने उपलब्ध करुन दिलेले आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार २००५ च्या तरतूदीप्रमाणे माहिती उपलब्ध

**करुन त्याची प्रक्रिया ही ३० दिवसांत करणे आवश्यक आहे. परंतू सदरच्या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती ही सहा दिवसाने विलंबाने दिलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये १५००/- एवढी शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्तीबाबत विचारणा केली असता माहिती ही वेळेत उपलब्ध करुन दिली जाईल असे आयोगापुढे सांगितले. परंतू विलंबाचा खुलासा समाधानकारक केलेला नाही. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांस पात्र आहे.**

## आदेश

१. **अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून,जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांनी अपिलकर्ता यांचे दि.२०.४.२०१० रोजीच्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम ८ (१) अन्वये ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नाही व ६ दिवस विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे त्यांचेवर रुपये १५००/- ची शास्ती लादण्यांत येते. सदरील शास्ती हे त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसुल करण्यांत येऊन पुढील लेखाशिर्षात जमा करण्यांत यावी.**

**" लेखाशिष क्र.००७- इतर प्रशासनिक सेवा**
**६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा (१८)**
**माहितीचा अधिकार (००७००१६-१) "**

२. **सदरील आदेशाची एक प्रत स्वतंत्रपणे आयुक्त,महानगरपालिका,मुंबई यांना पोष्टाने पाठवावी.**

३. **अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई
**दि.१०/१२/२०१०**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९६४७-/अपील क्र.६०४९/२०१०**

**श्री.शंभू सक्सेना, अपीलार्थी**
**पुष्पा सायकल मार्ट, संत सावता मार्ग,**
**ऑफ रे रोड स्टेशन, ऑन ब्रिज, माझ्गांव, मुंबई १०**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त**
**टी विभाग, मनपा, लाला देवी दयाल मार्ग,मुलूंड पश्चिम, मुंबई ८०**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारत व कारखाने) उत्तरवादी**
**टी विभाग, मनपा, लाला देवी दयाल मार्ग,मुलूंड पश्चिम, मुंबई ८०**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक २७.८.२०१०**
**सुनावणीचा दिनांक १०/१२/२०१०.**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपिलकर्ता यांनी दि.९.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, टी. विभाग यांचेकडे श्री.विश्वनाथ म्हस्के यांना त्यांचे अवैध बांधकामाबाबत नोटीस दिलेली आहे काय, व दिलेली असल्यास त्याची प्रत, तसेच श्री.विश्वनाथ म्हस्के यांचेकडून उत्तर आलेले आहे काय व पुन्हा दि.९.९.२०१० रोजी श्री.विश्वनाथ म्हस्के यांना नोटीस दिलेली आहे काय, याबाबत माहिती मागितलेली असल्याचे दिसून येते. सदरील अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.३०.७.२०१० रोजी माहिती उपलब्ध झाली परंतू त्यांने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.१३.७.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि.९.९.२०१० रोजी दिला असून अपिलकर्त्यास आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती १ महिन्यात निशुल्क देण्यांत याव्यात व अपिल मान्य करुन निकाली काढले, असा निर्णय दिलेला आहे. परंतू त्यानंतरही अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.**

**अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना दि.२७.९.२०१० रोजी १४३ पृष्ठाची माहिती मिळालेली आहे परंतू मुद्दा क्र.४ ची माहिती मिळालेली नाही. परंतू मुद्या क्र.४ चे अवलोकन केले असता ती कपोलकल्पीत मुद्याची माहिती आहे. त्या संदर्भामध्ये त्या कार्यालयातून माहिती उपलब्ध होऊ शकत नाही तसेच ती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही व त्याबाबत अपिलकर्ता यांना कळविलेले**

**असल्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्याने अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.**

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.**

२. **अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.१०/१२/२०१०** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९६४६-/अपील क्र.६०५०/२०१०**

**श्री.शंभू सक्सेना,** **अपीलार्थी**
**पुष्पा सायकल मार्ट, संत सावता मार्ग,**
**ऑफ रे रोड स्टेशन, ऑन ब्रिज,**
**माझगांव, मुंबई १०**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त**
**टी विभाग, मनपा, लाला देवी दयाल मार्ग,**
**मुलूंड पश्चिम, मुंबई ८०**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारत व कारखाने)** **उत्तरवादी**
**टी विभाग, मनपा, लाला देवी दयाल मार्ग,**
**मुलूंड पश्चिम, मुंबई ८०**

***---निर्णय---***

व्दितीय अपीलाचा दिनांक २७.८.२०१०
सुनावणीचा दिनांक १०/१२/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.७.६.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, टी विभाग यांचेकडे तक्रारीच्या स्वरुपामध्ये २३ पत्रे दिलेली होती व त्या २३ पत्राच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. माहितीचा कालावधी हा २००३ ते २०१० आहे. अर्जाच्या अनुषांगने दि.१२.७.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिली परंतू ती अपिलकर्ता यांना उपलब्ध झाली नाही म्हणून दि.६.७.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले होते.

३. प्रथम अपिलाचा निर्णय हा अपिलकर्त्यास आवश्यक असलेली कागदपत्रे दोन महिन्यांत देण्यांत यावी असा दिला व अपिल अमान्य करुन निकाली काढण्यांत आले. यावरुन असे दिसून येते की,अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू सदरहूं माहितीने अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर अपिलाच्या संदर्भामध्ये युक्तीवाद करताना अपिलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी २३ पत्रे दिलेली होती परंत त्यांना त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतू त्यांच्या काही तक्रारींच्या संदर्भामध्ये कारवाई केलेली आहे व ती तयांना कळविण्यांत आलेली आहे व कांही तक्रारीच्या संदर्भात मुद्दा क्र.४ मध्ये त्यांच्या उर्वरित तक्रारीच्या संदर्भामध्ये मुंबई महानगर पालिका यांचे अधिनियमाप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल असे सांगण्यांत आले. व त्यप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेले आहे असा निष्कर्ष काढून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे सदर तक्रारीबाबत ३० दिवसामध्ये त्याची चौकशी करुन

माहिती उपलबध करुन देणे अपेक्षित नाही परंतू त्यांच्या तक्रारीतील उर्वरित मुद्यांच्या संदर्भामध्ये कार्यवाही करण्यांत येईल असे आयोगापुढे सांगितले असल्यामुळे माहिती उपलब्ध झाली आहे म्हणून सदरील अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.**

**२. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रथम अपिलाचे आदेश विसंगत आहेत. माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले म्हणून अपील मंजूर करणे असे निर्णय-आदेश होतात. परंतू सदरच्या प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशात माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश दिले जातात व अपील आदेश मात्र 'अमान्य' असे आदेश दिलेले आहेत ते विसंगत आहेत. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपिलीय आदेश योग्य द्यावेत याची नोंद घ्यावी.**

**३.अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.१०/१२/२०१०** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९४६१-/अपील क्र.६१६८/२०१०**

**श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले, अपीलार्थी**
**सिध्दीविनायक प्रसाद, डॉ.शामा प्रसाद मुखर्जी रोड,**
**डोंबिवली पूर्व ४२५ २०१**
**ता.कल्याण जि.ठाणे.**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव**
**नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई ३२**

**२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी नवि-२३ उत्तरवादी**
**नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई ३२**

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक १६.८.२०१०
सुनावणीचा दिनांक १४/१२/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित. अपिलीय अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.२८.४.२०१० रोजी प्राप्त तसेच दि.३०.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी नगर विकास विभाग यांचे कडे "ठाणे नगरपालिका रिंगरुट प्रकल्पाबाबत अंतिम भूंखड क्रमांक ४६३ वरील सुधारित नकाशे मंजूर प्रकरणाची विभागीय चौकशीबाबतची माहिती तसेच शासन आदेशानंतर सदर विभागीय चौकशी कामी प्रकरण अग्रेषित केले असल्यास त्याची माहिती व केले नसल्यास तशी माहिती

मिळावी. उपरोक्त शासन आदेश ठाणे महापालिकेस बंधनकारक असल्यास सदर आदेशाचे पालन ज्या अधिका-याने करणे बंधनकारक आहे त्यांची नांवे पदासह माहिती मिळावी व सदर आदेशाची अवहेलना प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यांत येणार आहे त्या अधिका-यावर काय कारवाई करण्यांत येणार आहे " याबाबतची माहिती मागितली होती. माहितीचा कालावधी दि.२३.५.२०७ते आजपर्यंतचा आहे. माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.१.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,नगर विकास विभाग यांनी एक विभागीय प्रकरण शासनास प्राप्त झाले असून सदर प्रकरण शासन स्तरावर विचाराधीन आहे. या प्रकरणी शासन स्तरावर निर्णय झालेला नाही. याबाबत शासन स्तरावरुन केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती सोबत जोउलेल्या आहेत असे कळविलेले असल्याचे दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे त्यांने समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.१२.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.२३.७.२०१० रोजी देण्यांत आला असून अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेले असल्यामुळे (शासन स्तरावरुन केलेल्या कागदपत्राच्या प्रती) सदर अपील निकाली काढण्यांत आलेले असल्याचे दिसून येते. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता गैरहजर होते. परंतू त्यांचे व्दितीय अपील मेमो मध्ये अर्जदाराच्या मुद्या क्र.२ व ३ बाबत माहिती अधिका-यांने माहिती दिलेली नाही व त्यामुळे दंडात्मक कार्यवाही व्हावी असे अपिलकर्ता यांनी विनंती केलेली आहे. जन माहिती अधिकारी हे सुनावणीच्यावेळी उपस्थित नव्हते व त्यांचे तर्फे सुध्दा कोणतेही कागदपत्र दाखल करण्यांत आलेले नाहीत. परंतू अपिलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे केलेल्या युक्तीवादावरुन असे दिसून येते की, मुद्या क्र.२ च्या संदर्भामध्ये आयुक्त, ठाणे महानगर पालिका यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत व ठाणे महानगरपालिकेमध्ये प्रत्यक्ष कोण जबाबदार आहे, ही बाब आयुक्त ठाणे महानगरपालिका यांच्या अखत्यारित येत असल्याने मंत्रालयातील नगरविकास विभाग यांचे संबंधित जन माहिती अधिकारी या संदर्भात माहिती देऊ शकत नाहीत.

मुद्या क्र.१ च्या संदर्भामध्ये ठाणे महानगरपालिकेकडे केलेला पत्रव्यवहार हा उपलब्ध करुन दिलेला आहे. व त्यामुळे सदर प्रकरणी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे, अशी आयोगाची खात्री झालेली आहे. परंतू अपिलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती विलंबाने दिलेली आहे. आयोगाच्या नोटीशीमध्ये विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यास विलंबाचा खुलासा करावा असे नमूद केलेले आहे. परंतू त्याबाबत कोणताही खुलासा आयोगाकडे करण्यांत आलेला नाही. या विलंबाकरिता जन माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीप्रमाणे कलम ७ (१) प्रमाणे अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे माहितीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करुन ३० दिवसाचे आत उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांचे विरुध अधिनियमाच्या कलम २० (१)अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे परंतू तत्पूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे सदरील अपिल हे मजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून जन माहिती अधिकारी यांनी हे निर्णय मिळालयापासून १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. माहिती उपलब्ध करुन देण्यांस झालेल्या विलंबाच्या संदर्भात त्यांच्या विरुध्द अधिनियमाच्या कलम २० (१)अन्वये शास्ती कां लादण्यांत येऊ नये याबाबतचे म्हणणे आयोगापुढे समक्ष येऊन मांडावे. तसे न केल्यास त्यांचे विरुध्द विलंबाच्या दिवसाप्रमाणे प्रत्येकी र.२५०/- प्रमाणे शास्ती लादण्यांत येईल याची नोंद घ्यावी व सदर शास्तीची वसुली त्यांचे दरमहाच्या वेतनातून करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.**

२. **अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

Kj/dec 2010

**दि.१४/१२/२०१०** **(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९४६२-/अपील क्र.६१६७/२०१०**

**श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले,** **अपीलार्थी**
**सिध्दीविनायक प्रसाद, डॉ.शामा प्रसाद मुखर्जी रोड,**
**डोंबिवली पूर्व ४२५ २०१**
**ता.कल्याण जि.ठाणे.**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त**
**ठाणे महानगरपालिका भवन डॉ.अल्मेडा भवन,**
**चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे पश्चिम ४०००६०२**

**२. जन माहिती अधिकारी तथा** **उत्तरवादी**
**ठाणे महानगरपालिका भवन डॉ.अल्मेडा भवन,**
**चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे पश्चिम ४०००६०२**

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक १६.८.२०१०
सुनावणीचा दिनांक १४/१२/२०१०.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.२८.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, ठाणे महानगरपालिका यांचेकडे **"ठामपा-२००७/१३१/प्र.क्र.९७/नवि-२३ नगर विकास विभाग दि.१५.११.२००८ रोजीचे पत्र तसेच पत्र क्रमांक ठामपा-२००७/१३१/प्र.क्र.-९७/नवि-२३ नगर विकास विभाग दिनांक २३.०२.२०१० रोजीचे**

**पत्र, ठाणे महानगरपालिका नियोजित रिंगरुट प्रकल्पाबाबत अंतिम भूखंड क्रमांक ४६३ वरील सुधारित नकाशे मंजूर प्रकरणाची विभागीय चौकशी करणेबाबत माहिती. शासनाने आदेश केल्यानंतर आजच्यातारखेपर्यत ठाणे महापालिका प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीची धारिकेची सत्यप्रतीसह माहिती. उपरोक्त प्रकरणी विभागीय चौकशी बाबत शासनाकडे पाठविलेल्या अहवालाची सत्यप्रत. उपरोक्त प्रकरणी दि.२३.५.२००७ दि.२३.२.२०१० पर्यत शासन आदेशाचे पालन झाले नसल्यास तशी माहिती शिघ्र टपालाने घेणारे असे नमूद केले आहे"**

**३.** अर्जाच्या अनुषंगाने कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.११.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले परंतू प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता गैरहजर होते परंतू त्यांनी कागदपत्र दाखल केलेली आहे व लेखी जबाब सुध्दा दाखल केलेला आहे. जन माहिती अधिकारी, ठाणे महानगरपालिका व अपिलीय अधिकारी हे गैरहजर होते **आयोगाच्या कार्यालयातून दि.२९.११.२०१० रोजी उपस्थित राहण्यासाठी कारणे दाखवा नोटीस काढण्यांत आली होती तरीही उत्तरवादी उपस्थित राहिलेले नसल्याने त्यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे.** परंतू संध्याकाळी ५.०० वाजता तत्कालीन जन माहिती अधिकारी हे उपस्थित झाले व त्यांनी खुलासा सादर केला परंतू तो समाधानकारक नाही. तसेच जन माहिती अधिकारी, ठाणे महानगरपालिका यांनी अपिलकर्ता यांच्या दि.२८.४.२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे अधिनियमाच्या कलम २०(१)प्रमाणे ते दोषी आढळून येत असलयामुळे त्यांचेवर रुपये १०,०००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन केलेले असल्यामुळे आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी त्यांचेविरुध्द प्रशासकिय कारवाई कारणे आवश्यक आहे व त्याकरिता सदरील अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून अपिलकर्ता यांच्या दि.२८.४.२०१० रोजी माहितीच्या अर्जापमाणे अधिनियमाच्या कलम ७ (१)प्रमाणे ३०दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम २०(१)अन्वये जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा सादर केलेला नसल्यामुळे त्यांचेविरुध्द रु.१०,०००/- शास्ती लादण्यांत येते. शास्तीची वसुली त्यांचे दरमहाच्या वेतनातून करण्यांत यावी व ती पुढील लेखाशिर्षा खाली जमा करण्यांत यावी.**

**" लेखाशिष क्र.००७- इतर प्रशासनिक सेवा**
**६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा (१८)**
**माहितीचा अधिकार (००७००१६-१) "**

**२. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाचे तसेच शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी प्रशासकिय कारवाई करावी.**

**३. अपिलकर्ता यांचे दि.२८.४.२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना १० दिवसांत आत शिघ्र टपालाने त्यांनी मागितलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्यांत यावी.**

**४. सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना पोष्टाने पाठवावी.**

५. **अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई
**दि.१४/१२/२०१०** **(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

**प्रत,**

**१. मा.आयुक्त ठाणे मजहानगरपालिका महानगरपालिका भवन,डॉ.अल्मेडा भवन, चंदनवाडी, पाचपाखाडी,ठाणे पश्चिम ४००० ६०२ यांजकडे माहितीसाठी तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.**
**२. निवडनस्ती (शास्ती)**
**३. निवडनस्ती.**
**४. श्री.चौरे सहाय्यक**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९४६१-/अपील क्र.६१६६/२०१०**

**श्री.मितेष मणिलाल गडा** **अपीलार्थी**
**मे.परी डिझाईन स्टुडिओ, तळमजला,दुकान क्र.२**
**वृंदावन भवन २५३, काळबादेवी रोड, मुंबई ४०००२**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी**
**रु.नं.३१०/३११, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय,**
**३ रा मजला, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई ४०० ०२३**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक नगर रचनाकार** **उत्तरवादी**
**रु.नं.३१०/३११, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय,**
**३ रा मजला, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई ४०० ०२३**

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक १६.८.२०१०

सुनावणीचा दिनांक १४/१२/२०१०.

अपीलार्थी व अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.१७.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक रचनाकार, मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे कडे माहितीचा अधिकारात दि.१.२.२०१० रोजी सहाय्यक नगर रचना यांच्याकडे दि.३.७.२००६ रोजी अपेक्षितलेली माहिती व रेकॉर्ड प्रधान मुद्रांक कार्यालय, नगर भवन फोर्ट मुंबई यांचे पत्र क्र.अेडीजे/१२०२/अे/०६एम, श्री. चंद्रभान चुनीलाल अग्रवाल यांनी जमा केलेली फाईलमधील संपूर्ण माहिती मिळावी व त्याच्या सर्टीफाईड कॉपी मिळाव्यात इत्यादि माहिती मागितलेली दिसून येते. सदरील माहिती व्यक्तिशः घेणार असे दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी सदरील अजीच्या अनुषगाने दि.१५.४.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्या माहितीने समाधान न झाल्याने दि.२१.४.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले, प्रथम अपिलाचा निर्णय दि.२५.६.२०१० रोजी देण्यांत आला असून माहिती अधिकारी तथा सहायक रचनाकार यांनी त्यांचे कार्यालयातील लिपिकाच्या मदतीने प्रकरणाचा शोध घेउुन अपिलकार यांना दि.२५.६.२०१० पर्यत उपलब्ध करुन देण्याबाबत आदेशित केल्याचे दिसून येते. व त्यानंतर दि.२४.६.२०१० रोजी पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी प्रकरणाचा शोध घेऊन प्रकरणाचा आढळ होत नाही. त्यामुळे सदरील प्रकरणातील कागदपत्राच्या प्रती पुरविता येत नाही असे कळविलेले असल्याचे दिसून येते व त्यामुळेच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, २००६ मधील नस्ती उपलब्ध होत नाही ही सबब दिशाभूल करणारी आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, नस्ती उपलब्ध झाली नाही म्हणून माहिती देता येत नाही. इतर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.परंतू जन माहिती अधिकारी यांनी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सन २००६ ची नस्ती उपलब्ध होत नाही असे कारण देऊन माहिती उपलब्ध करुन देता येत नाही हे सांगणे म्हणजे त्यांची अकार्यक्षमता दर्शविते.

५. सन २००६ च्या नस्तीच मिळत नसेल तर ती विभाग प्रमुखाची सुध्दा अकार्यक्षमता आहे व नस्तीचा शोध घेतल्यानंतर ती जर मिळत नसेल तर संबंधित नस्तीचे जतन करण्याची जबाबदारी ही ज्या अधिका-याची व कर्मचा-याची असेल त्याचेविरुध्द नियमाप्रमाणे कारवाई करुन मगच आयोगापुढे उपस्थित होणे हे योग्य असते. जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदरच्या नस्तीच्याबाबत गहाळ होण्याच्या संदर्भामध्ये चौकशी करुन संबंधित कर्मचारी/अधिक-याविरुध्द प्रशासकिय कारवाई करावी. महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५या नियमाप्रमाणे संबंधित कर्मचा-याविरुध्द/अधिका-याविरुध्द कारवाई करावी व तसे आयोगास कळवावे.त्यामुळ सदरचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून प्रथम अपिलीय अधिकारी किंवा विभाग प्रमुख यांनी सदरील नस्तीचा कसून शोध घ्यावा व ती उपलब्ध न झाल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५च्या तरतूदीप्रमाणे अभिलेख जतन करण्याची जबाबदारी संबंधित कर्मचारी/अधिकारी यांची असल्याने कलम ९ प्रमाणे कारवाई करावी व त्याचा अहवाल आयोगास १५ दिवसाचे आत सादर करावा. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**२. नस्ती उपलब्ध झाल्यास अपिलकर्ता यांनी त्यांच्या दि.१७.३.२०१० रोजीच्या अर्जाप्रमाणे कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामूल्य अपिलकर्त्यास उपलब्ध करुन द्याव्यात.**

३. **अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.१४/१२/२०१०** **(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९४५७-/अपील क्र.६१५५/२०१०**

**श्री.संजय पुरुषोत्मक सोलंकी,** **अपीलार्थी**
**शक्ती मेन्स वेअर सर्वोदय हॉस्पीटल जवळ,**
**गोळीबार रोड, घाटकोपर पश्चिम, मुंबई ८६**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा महानगर आयुक्त,**
**एम.एम.आर.डी.ए. कार्यालय, वांद्रे-कुर्ला कॉम्लेक्स,वांद्रे पूर्व मुंबई ५१**

**२. जन माहिती अधिकारी तथा** **उत्तरवादी**
**एम.एम.आर.डी.ए. कार्यालय, वांद्रे-कुर्ला कॉम्लेक्स,वांद्रे पूर्व मुंबई ५१**

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक ११.८.२०१०
सुनावणीचा दिनांक १०/१२/२०१०.
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.१७.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी एम.एम.आर.डी.ए. कार्यालय, यांचेकडे दि.२६.२.२०१० रोजी श्रीम.रत्नाबाई पांडूरंग निकम यांच्या अर्जाबाबत केलेली कारवाई माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.२८.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे दाखल केलेला खुलासा व युक्तीवादावरुन असे दिसून येते की, अपिलकर्ता यांच्या दि.२१.५.२०१० रोजीचा अर्ज प्राप्त झाला. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तो अर्ज श्री.नितीन कदम.भुमापक यांनी त्वरीत माहिती देण्यात यावी असा शेरा मारुन श्री.नितीन कदम यांचेकडे अर्ज हस्तांतरीत केला. श्री. कदम यांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तद्नंतर अपिलकर्ता यांनी प्रथम अपिलाबाबत कार्यवाही करण्याबाबत कळविले होते परंतू श्री नितीन कदम,भुमापक यांनी संबंधित अपिलावर कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी, श्री.नितीन कदम यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यांत यावी अन्यथा त्यांचेविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यांत येईल असे दि.३.९.२०१० रोजी निर्देश दिलेले आहेत व त्याबाबतची प्रत सोबत जोडण्यांत आलेली आहे व त्यानंतर सुनावणी दरम्यान दिलेल्या निर्देशानुसार अर्जदार यांना दूरध्वनीव्दारे कार्यालयात बोलविण्यांत आले होते परंतू ते व्यक्तिशः कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. त्यामुळे उत्तराची प्रत व माहिती स्पीड पोस्टाने पाठविण्यांत आलेली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीची अंमलबजावणी कशी करायची असते याची माहिती आहे असे दिसून येत नाही.

५. अधिनियमाच्या कलम ६ (१)प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी द्यावयाची असते ती कोणत्याही लिपिकाने अथवा कर्मचा-याने माहिती उपलब्ध करुन द्यावयाची नसते. लिपिकाने माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देणे म्हणजे माहिती देण्याची जबाबदारी टाळणे असा त्याचा अर्थ होतो. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक असते. लिपिकाने सुध्दा माहिती देण्याचा प्रयत्न केला नाही. आयोगापुढे सुनावणीस येण्यापूर्वी ज्या संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांनी माहिती देण्यास विलंब केलेला आहे त्यांचेविरुध्द प्रशासकिय योग्यती कारवाई करुनच आयोगापुढे उपस्थित रहाणे योग्य असते.

६. या संदर्भामध्ये दि.३.९.२०१० रोजी प्रलंबित अर्जाचा तातडीने निपटारा करावा व जर योग्य मुदतीत अर्जाचा निपटारा झाला नाही तर संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचे विरुध्द दंडात्मक कारवाई होईल याची नोंद घ्यावी असे तहसिलदार यांनी दिलेले आदेश हे पुरेस नाहीत.

७. माहितीचा अधिकार अधिनियमाप्रमाणे किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्या प्रकरणाची सुनावणी घेऊन आदेश निर्गमित केलेले नाहीत व त्यामध्ये जन माहिती अधिकारी किंवा संबंधित लिपिक हे दोघेही माहिती उपलब्ध करुन देण्याच्या विलंबास जबाबदार आहेत, अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे संबंधित लिपिक व जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक असते परंतू त्यांनी सुध्दा प्रथम अपिलावर लिपिकाने कार्यवाही करावी असे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून जन माहिती अधिकारी व लिपिक यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम ५ (४)व(५) प्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी समजण्यांत येऊन या दोघांविरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१)अन्वये प्रत्येकी रुपये ५०००/- शास्ती लादण्यांत येते**

२. सदर शास्ती ची वसुली त्यांच्या दरमहाच्या वेतनातून करण्यांत यावी व पुढील लेखाशिर्षाखाली जमा करण्यांत यावी.

" लेखाशिष क्र.००७- इतर प्रशासनिक सेवा
६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा (१८)
माहितीचा अधिकार (००७००१६-१) "

३. सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, एम.एम.आर.डी.ए, बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा यांना स्वंतत्रपणे पोष्टाने पाठविण्यांत यावी.

४. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.१४/१२/२०१०

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबइ

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.

क्र-मुमाआ/४९४५७-/अपील क्र.६०४३/२०१०

श्री.गणेश विठ्ठल नखाते — अपीलार्थी
२०९/४,५,६ हिराबाई चाळ, गणेशबाग लेन,
गणेशबाग लेन कुर्ला पोलिस स्टेशनच्या मागे,
कुर्ला पश्चिम मुंबई ४००० ७०

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा विधी खाते
बृहनमुंबई महानगर पाकि इमारत विस्तार दुसरा माळा, मुंबई

२. जन माहिती अधिकारी तथा विधी खाते — उत्तरवादी
बृहनमुंबई महानगर पालिका इमारत विस्तार दुसरा माळा, मुंबई

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक ९.९.२०१०
सुनावणीचा दिनांक १०/१२/२०१०.

अपीलार्थी उपस्थित. व अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.१९.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी विधी खाते, नविन प्रशासकिय इमारत महानगरपालिका यांचेकडे दि.२०.३.२०१० रोजी दिलेल्या पत्रावर कार्यवाही करणा-या अधिका-याचे नांव काय आहे. त्याची कार्यालयीन छायाप्रत मिळावी तसेच एकूण ४ मुद्यांवर अनधिकृत दुकानाच्या संदर्भामध्ये माहिती तसेच जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितलेले असल्याचे दिसून येते. माहिती स्वहस्ते घेऊन जाणार असे नमूद केलेले आहे.

३. अपिलकर्ता यांचे अर्जाचे अनुषंगाने दि.२६.७.३०१० रोजी सदरचा अर्ज हा देवनार पशुवधन गृह यांच्याकडे पाठविलेला आहे असे त्यांना कळविण्यांत आलेले दिसून येते. तसेच दि.२९.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये उत्तर दिलेले दिसून येते त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.१३.८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले.

४. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दि.२०.३.२०१० रोजीचे पत्र विधी सल्लागार यांना प्राप्त झाले होते. ते पत्र दि.२५.३.२०१० रोजी व्यवस्थापक, देवनार पशुवधगृह यांचेकडे पाठविले. परंतू व्यवस्थापक, देवनार पशुवधगृह यांचा काहीही संबंध नाही असे अर्जदाराने सांगितल्यामुळे मागितलेली माहिती आजपासून ८ दिवसांत द्यावी व दि.२४.८.२०१० रोजी सुनावणी दरम्यान उपरोक्त माहिती मिळविण्यासाठी दिलेला अर्ज विचारात घेता येणार नाही, त्यामुळे तो मुळ अर्जाचा भाग नाही. त्यांनी अतिरिक्त माहिती मिळविण्यासाठी दुसरा वेगळा अर्ज करण्याची गरज आहे असा निर्णय दिला . त्यामुळे अपिलकर्ता यांना दि.६.९.२०१० रोजी माहिती अर्जाची उत्तरे दिलेली दिसून येतात. परंतू त्यांने त्यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, अनधिकृत दुकानांच्या कारवाई संदर्भातील नियम विज,लाईट,पाणी इत्यादिची माहिती त्यांना अपेक्षित आहे. दि.२०.३.२०१०च्या पत्रावर कार्यवाही करणा-या अधिका-याचे नांव अपेक्षित आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता सदर माहिती विधी विभागाकडे उपलब्ध नसते तरी ती कारवाई करणा-या विभागाकडे संपूर्ण माहिती उपलब्ध असते व त्याप्रमाणे त्यांनी दि.२७.८.२०१० रोजीच्या मुदतीत कळविण्यांत आलेले होते. परंतू प्रथम अपिलाच्या निर्णयाप्रमाणे त्यांना मुददेनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. विधी विभागातील प्रकरणामध्ये बाहेरच्या व्यक्तिस विधी सल्ला मागणी करता येत नाही व ज्या प्रकरणात विधी सल्ला मागितला जातो त्या नस्त्या परत केल्या जातात त्यामुळे कार्यवाहीच्या संदर्भामध्ये कोणतीही माहिती विधी विभागात मिळू शकत नाही तसेच विधी विभागाने अभिप्राय दिलेली असतील तर त्याबाबतची माहिती सुध्दा त्या संबंधित विभागाकडे मिळू शकते व त्यामुळे अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात दिलेली माहिती योग्य होती असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. परंतू अपिलकर्ता यॉनी या संदर्भामध्ये योग्यती कार्यपध्दतीची माहिती दिल्यामुळे त्यांना अनधिकृत दुकानाची कार्यवाही संदर्भात वीज लाईट,पाणीच्या करिता असलेल्या नियमांची परिपत्रकाची इत्यादि माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आयोगासमारे अपिलकर्ता यांनी सांगितले व त्याप्रमाणे नियम किंवा परिपत्रक असल्यास विधी विभागातील जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. दि.२०.३.२०१० च्या पत्रावर कार्यवाही करणा-या अधिका-याचे नांव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील त्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून अनधिकृत दुकानाच्या संदर्भामध्ये कार्यवाही करण्याचे जे नियम आहेत त्या नियमावलीच्या छायांकित प्रती तसेच दि.२०.३.२०१० च्या अर्जावर कार्यवाही करणा-या अधिका-याचे नांव हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्त्यास विनामूल्य रजिस्टर पोस्टाने पाठवावी**

**२.अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई
**दि.१४/१२/२०१०** **(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९४७७-/अपील क्र.६९९५/२०१०**

**श्री. अरिफ एच. मोहन** **अपीलार्थी**
**५५/७७, शेरिअर बाग, बी-ब्लॉक,**
**शॉप नं.६, आर.सी.भटट् मार्ग,**
**मुंबई ४०० ००९**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष झोन -१)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका १२१, रामचंद्र भट्ट मार्ग, बाबुला टॅक क्रॉस लेन,**
**मुंबई ४०० ०९**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ.व का.)** **उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका १२१, रामचंद्र भट्ट मार्ग, बाबुला टॅक क्रॉस लेन,**
**मुंबई ४०० ०९**

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक १७.८.२०१०
सुनावणीचा दिनांक १५/१२/२०१०.

अपीलार्थी उपस्थित. व अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी महापालिकेच्या कार्यालयात दि.२७.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी,सहायक आयुक्त, बी वॉर्ड यांचेकडे त्यांच्या दि.१७.३.२०१०,६.४.२०१० व १३.४.२०१० च्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या तक्रारीमध्ये अवैध बांधकाम ७,उमरखाडी,क्रॉस लेन,अख्तर बिल्डिंग समोर,निशान पाडा रोड, मुंबई संदर्भात माहिती मागितलेली होती. माहिती व्यक्तिशः घेऊन जाणार असे नमूद केलेले आहे. माहितीचा कालावधी दि.१७.३.२०१० ते २६.७.२०१० आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.१०.६.२०१० रोजी आपण मागितलेली माहिती कार्यालयामध्ये तयार आहे व आपण निरिक्षणाकरिता हजर रहावे, असे कळविलेले दिसून येते. दि.२६.६.२०१० रोजी अपिलार्थी यांनी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये अपिलकर्ता यांनी दि.१३.६.२०१० रोजी सहायक अभियंता, पर्यावरण यांनी अवैध बांधकामामध्ये कारवाई करावी, असे आदेश दिलेले आहेत व त्याबाबत कळविलेले असल्याचे दिसून येते. त्यानंतर दि.१५.७.२०१० रोजी अपिलकर्ता यांना झालेल्या कार्यवाहीबाबत पुन्हा कळविण्यांत आले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.३१.६.२०१० रोजी देण्यांत आला असून माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना अवैध बांधकामाच्या संदर्भामध्ये असलेल्या नस्तीचे निरिक्षण द्यावे. तसेच प्रत्यक्ष जागेवर जाऊन निरिक्षण करावे व अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून व अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले.

५. जन माहिती अधिकारी हे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्र दाखल केलेले दिसून येत नाहीत परंतू जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी अनधिकृत बांधकाम दाखवून दिल्यानंतर सुध्दा कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. परंतू त्यांनी पुढे असेही सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी संबंधित अवैध बांधकामाच्या संदर्भामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या अधिनियमातील कलम ३५४ प्रमाणे नोटीस देण्यात आलेल्या आहेत व मात्र ज्या व्यक्तीना नोटीस दिलेल्या, त्या नोटीशीस संबंधित व्यक्तीनी जी उत्तरे दिलेली आहेत त्या उत्तराची प्रतही त्यांना उपलब्ध करुन दिली जात नाही, असे दिसून येते. कार्यालयातून कार्यवाही झालेली आहे परंतू त्या कार्यवाहीची कागदपत्र उपलब्ध करुन दिली जात नाहीत. त्याकरिता अपिलकर्ता याचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी मुंबई महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या कलम ३५४ प्रमाणे संबंधित व्यक्तीस काढण्यांत आलेली नोटीस व त्या नोटीशीस संबंधित व्यक्तीने जी उत्तरे दिलेली आहेत त्या उत्तराच्या प्रती विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारत व कारखाने) हे आयोगापुढे सुनावणी साठी उपस्थित राहिलेले नसल्यामुळे तसेच अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेलेली असल्याने अधिनियमाच्या कलम १९ (५)च्या तरतूदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे शास्ती का लादण्यांत येऊ नये याचा खुलासा आयोगापुढे समक्ष येऊन हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत करावा अन्यथा त्यांचेविरुध्द शास्ती लादण्यांत येईल याची नोंद घ्यावी.**

**३.अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.१५/१२/२०१०**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

Kj/dec 2010

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९४८६-/अपील क्र.६९९६/२०१०**

**श्री. भालचंद्र केशव सिंगम** **अपीलार्थी**
**चंदन मॅशन, ३ रा मजला, रु न.५८**
**गोपाल कृष्ण गोखले मार्ग, पोर्तूगिज चर्चसमोर**
**दादर पश्चिम मुंबई २८**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग कार्यालय,**
**१ ला मजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर पश्चिम मुंबई २८**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (नगर रचिना-१)** **उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग कार्यालय,**
**१ ला मजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर पश्चिम मुंबई २८**

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक २३.८.२०१०

सुनावणीचा दिनांक १५/१२/२०१०.

अपीलार्थी,जन माहिती अधिकारी उपस्थित. व अपिलीय अधिकारी, अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी संदर्भ क्र.असीजीएन/४०५८७/अेइटीपी(आय)दि.१०.३.२०१० च्या संदर्भात दिलेल्या अहवालाची प्रत मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तिश: घेणार असे नमूद केलेलेआहे. तसेच अर्जासोबत त्यांनी दि.२.१.२०१० च्या तक्रारीची प्रत जोडलेली आहे व त्या तक्रारीवरील कार्यवाही त्यांनी मागितलेली असल्याचे दिसून येते.

३. दि.१०.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, सहायक आयुक्त (जी/उत्तर विभाग) यांचेकडे विहित कालावधीत आवश्यकती माहिती अर्जदारास देण्यांत यावी व संबंधितांना पाठविण्यांत आलेल्या पत्राची एक प्रत या कार्यालयात पाठविण्याची व्यवस्था करावी असे कळविलेले दिसून येते व त्याचप्रमाणे दि.८.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी (जी/उत्तर) यांचेकडून अपिल अर्जात मागणी केल्याप्रमाणे दि.२.१.२०१० च्या तक्रारीच्या संर्भामध्ये आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांचेकडे अहवाल सादर करण्यांत येईल व अहवाल वरिष्ठांकडे सादर केल्यानतर एक प्रत आपणांस पाठविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतू त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.११.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.१७.६.२०१० रोजी देण्यांत आला असून ज्या वेळेस अहवाल सादर करण्यांत येईल त्यावेळी अहवालाची प्रत अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यांत येईल अशा प्रकारचे आदेश दिलेले दिसूनयेतात. त्यानंतर अपिलकर्ता यांना दि.८.११.२०१० रोजी अहवालाची प्रत उपलब्ध करुन दिली परंतू त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता यांनी आयोगाकडे युक्तीवाद करताना असे सांगितले की, प्रत्यक्षात त्यांना दि.२.१.२०१० रोजी महानगरपालिक ा आयुक्त, अति.आयुक्त, उप आयुक्त, सहायक आयुक्त, यांचेकडे **DCR 33 (7)for redevelopment of the plot bearing FP NO 144 D.V.Vaidya Road TPS IV Mahim in G/N ward of** Mumbai च्या संदर्भामध्ये तक्रार दाखल केली होती परंतू त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये त्यांनी श्रीमती. गंगाबाई शेडगे यांची खोली क्र.५ च्या संदर्भात क्षेत्रफळ दुरुस्ती करावी त्यानंतर ज्या भाडेकरुनी महापालिकेचे नुकसान करुन श्री.नथुराम शेडगे यांना फायदा करुन दिला त्यांचे विरुध्द एफ.आय.आर. दाखल करण्याची मागणी केली होती. परंतू अद्यापपर्यत त्यांना त्याबाबतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि. ८.११.२०१० रोजी माहिती दिलेली आहे. त्यावर अपिलकर्ता यांनी असे सांगितले की,क्षेत्रफळ दुरुस्त करण्याची माहिती दिली. परंतू संबंधित अधिका-याच्या विरुध्द एफ.आय.आर. दाखल केले किंवा नाही, याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहितीअधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची कारवाई त्यांच्या कार्यकक्षेत येत नाही. परंतू अपिलकर्ता यांनीपुन्हा आयोगापुढे सांगितले की, ती कार्यवाही सहायक अभियंता (जी/उत्तर)यांचे कार्यकक्षे त येत असल्यामुळे त्यांनी त्या संदर्भात कार्यवाही करुन देणे आवश्यक होते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांच्या दि.२.१.२०१० च्या तक्रारीमध्ये परिच्छेद क्र.७ मधील विनंतीनुसार 'ब' प्रमाणे कार्यवाही केली किंवा नाही याबाबतची माहिती अपिलकर्ता यांना सविस्तरपणे पुरविणे संयुक्तिक राहील. सदरचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे

## आदेश

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत अपिलकर्ता यांचे दि.२.११.२०१० च्या तक्रारीच्या संदर्भामध्ये परिच्छेद ७ मधील केलेल्या विनंतीप्रमाणे कार्यवाही केली किंवा नाही याबाबत स्पष्टपणे कळविण्यांत यावे. तसे न कळविल्यास जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादण्यांत येईल याची नोंद घ्यावी.**

**२.अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.१५/१२/२०१०** **(विलास पाटील)**

Kj/dec 2010

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९४७५-/अपील क्र.६९९७/२०१०**

**श्री. कन्हैयालाल बी.वर्मा, .अपीलार्थी**
**प्लॉट नं. १०५ डी-६, साईधाम गृहनिर्माण संस्था (म्हाडा)**
**स्वामी विवेकानंद शाळेसमोर, गोराई-१, बोरीवली पश्चिम,मुंबई ४०००९२**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व मुंबई ४०००५१**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१ उत्तरवादी**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व मुंबई ४०००५१**

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक १९.८.२०१०
सुनावणीचा दिनांक १५/१२/२०१०.
अपीलार्थी,जन माहिती अधिकारी उपस्थित. व अपिलीय अधिकारी, अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.५.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे तक्रार अर्ज केला सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, सहकारी संस्थ श्री.काकडे यांनी आपण सादर केलेल्या संदर्भित अर्जात नमूद केलेले मुद्याची पडताळणी केली असता सदरील मुद्दे या कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात येत नसल्याने याबाबतीत त्यांना उपविधी क्र.१७५ मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित विभागाकडे दाद मागून माहिती प्राप्त करुन घेणे उचित राहील. परंतू त्याने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२८.६.२०१० रोजी पुन्हा उपनिबंधक, तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर केला. सदरच्या अर्जाच्या अनुषगाने दि.२६.७.२०१० रोजीची तक्रार प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) नुसार माहिती देण्याचा प्रश्न उद्भावत नाही असे कळविले असल्याचे दिसून येते. त्यानंतर त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, ते राहतात ती इमारत म्हाडाच्या अखत्यारित आहे त्यामुळे ज्यांच्याविरुध्द तक्रार केलेली आहे ते अवेधत हॉटले चालवितात, दादागिरी करतात, पाण्याचा वापर करतात अशी तक्रार केलेली होती. परंतू ही बाब सहकार विभागाच्या अंतर्गत येत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना कळविले आहे व ती तक्रार संबंधित खात्याकडे करणे आवश्यक होते. निवासी वापराच्या ठिकाणी अवैद्यरित्या हॉटेल चालविणे अवैध असल्याने सदरची तक्रार ही म्हाडाकडे करणे आवश्यक होते, त्याप्रमाणे अपिलार्थी यांस कळविण्यांत आलेले आहे. अपिलकर्ता यांना सदरची तक्रार म्हाडाकडे करावी, असे सुनावणीच्या वेळी सांगण्यांत आले त्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यांत येते.**

**२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.१५/१२/२०१०** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र-मुमाआ/ २६५५/तक्रार क्र.१५४९/२०१०**

**श्री. चेतन कोठारी** **तक्रारदार**

**५२,ओसेनीक अपार्टमेंट,**

**डॉ,राजाबाई पटैल लेन समोर**

**बी देसाई रोड, मुंबई ४०००२६**

**१.जन माहिती अधिकारी तथा पोलिस आयुक्त**

**पोलिस आयुक्त यांचे कार्यालय**

**२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी** **उत्तरवादी**

**गृह विभाग ७ वा मजला,मंत्रालय,मुंबई**

*---निर्णय---*

तक्रारीचा दिनांक २८.८.२०१०

सुनावणीचा दिनांक १५/१२/२०१०.

तक्रारदार,दोन्ही जन माहिती अधिकारी उपस्थित.

२. तकारदार यांनी अपिल क्र.५०६५४/०२ व तक्रार क्र.५९३/०१ यामधील आयोगाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत १८(१) प्रमाणे तक्रार केलेली आहे.

३. सदरच्या तक्रारीची सुनावणीमध्ये गृह विभागाकडून माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. परंतू अर्जदारास द्यावयाची माहिती बृहन्मुंबई पोलिस आयुक्तालयातील विविध आस्थापना विभागाशी संबंधीत असल्याने

त्या संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करुन माहिती संकलित केली. सदरच्या अपिलाच्या सुनावणीमध्ये पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई हे उत्तरवादी नव्हते. माहिती संकलित करण्यास आणि उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेलाआहे. परंतू सुनावणीवेळी संपूर्ण माहिती मुद्देनिहाय उपलब्ध झालेली असल्याने ती तक्रारदार यांना पुरविताआली. तक्रारदार यांनी सुध्दा मुद्देनिहाय माहितीच्या संदर्भाचे अवलोकन केले असता ती स्विकारलेली आहे व जन माहिती अधिकारी यांचेकडे त्याची पोंच आहे त्यामुळे सदर तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१. तक्रारदार याची तक्रार निकाली काढण्यांत येते.**

**२. तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.१५/१२/२०१०** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९८३८-/अपील क्र.७००५/२०१०**

**श्री. चंद्रेश कांतिकुमार इंजिनिअर** **अपीलार्थी**
**१४४-ए, व्ही.पी.रोड,**
**नारायण सदन, २रा व ३ रा मजला,मुंबई ४००००४**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उप आयुक्त (प्र)**
**धर्मादाय आयुक्त म.रा. कार्यालय, ८३, डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी,मुंबई ४०० ०१८**

**२. जन माहिती अधिकारी /** **उत्तरवादी**
**धर्मादाय आयुक्त म.रा. कार्यालय, ८३, डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी,मुंबई ४०० ०१८**

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक २१.९.२०१०
सुनावणीचा दिनांक २०/१२/२०१०.
अपीलार्थी उपस्थित. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

२. अपिलकर्ता यांनी दि.२.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालयामध्ये" मदनलाल त्रिभोवनदास इंजिनिअर व रत्ना निधी चूरिटेबल ट्रस्ट यांच्यामध्ये झालेल्या भाडेकराराच्या " संदर्भातील प्रत मागितलेली असल्याचे दिसून येते. तसेच महेंद्रा जी. मेहता यांनी सदरची मालमत्ता भाडेतत्वावर घेता येईल का, या संदर्भातील माहिती ४ मुद्यांमध्ये मागितलेली असल्याचे दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.७.७.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना अपिल अर्जात मागितलेली माहिती या कार्यालयाच्या न्याय शाखेच्या अधिकाराखाली येत असल्याने ती त्यांच्याकडून मागणी केली आहे, ती प्राप्त होताच आपणांस विनाविलंब पुरविण्यांत येईल असे कळविले असल्याचे दिसून येते. परंतू त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.५.८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.४.९.२०१०रोजी देण्यांत आला असून अपिल नामेंजूर करण्यांत आले असून अपिलकर्ता यांनी संबंधित कार्यालयाच्या विभागाशी संपर्क साधून आवश्यकती माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले असल्याचे दिसून येते. परंतू त्यानां तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

३. सुनावणीच्यावेळी अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलकर्ता हे धर्मादाय आयुक्त कार्यालयातील संबंधित विभागात गेले होते परंतू त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच रत्ना निधी ट्रस्ट यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन द्यावी त्या करिता रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्टला पक्षकार केलेले आहे.

४. जन माहिती अधिकारी सुनावणीच्यावेळी गैरहजर होते त्यांनी कुठल्याही प्रकारचे कागदपत्रेही आयोगापुढे सादर केलेले नाहीत. परंतू अपिलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते की, 'सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय' यांच्या माहिती अधिकारी यांना माहिती तात्काळ पाठविण्यात यावी अशा प्रकारचे पत्र दिलेले असल्याचे दिसून येते व त्यानंतर अपिलकर्ता यांनी वर नमूद केल्याप्रमाणे परत पत्र दिले परंतू माहिती दिलेली नाही. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये विवेचन केलेले आहे. परंतू त्या विवेचनामधून माहिती मात्र उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये काहीच निर्णय दिल्याचे दिसून येते नाही. अपिलकर्ता यांनी

संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून आवश्यकती माहिती उपलब्ध करुन घ्यावी अशा प्रकारचे निरर्थक निर्णय दिलेला दिसून येतो. 'सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय' हे धर्मादाय आयुक्त या कार्यालयाच्या अधिकाराखाली येते, असे दिसून येते व तसे जर असेल तर माहिती अधिकारी, धर्मादाय आयुक्त कार्यालय यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन घेऊन अपिलार्थीस पुरविणे आवश्यक होते.

५. रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्ट व श्री.मदनलाल त्रिभोवनदास इंजिनिअर, महेंद्रा जी. मेहता यांच्यामध्ये जर भाडेकरार झालेला असेल तर त्याबाबतची माहिती ही संबंधित कार्यालयाच्या न्याय शाखेतून प्राप्त झालेली नाही, असा निष्कर्ष काढावा लागतो.

६. अपिलकर्ता यांनी रत्ना निधी चॅरिटेबल टस्ट यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन द्यावी असे व्दितीय अपील चर्चेत म्हटलेले आहे परंतू रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्याकडे अपिलकर्ता यांनी माहिती मागितलेली नाही व त्यामुळे आयोगापुढे रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्ट हे पक्षकार असले तरी मुळ माहितीचा अर्ज हा त्या ट्रस्टकडे केलेला नसल्याने त ट्रस्टला अपिलात पक्षकार करता येत नाही व हा ट्रस्ट खाजगी आहे किंवा सार्वजनिक ट्रस्ट आहे याबद्दलची माहिती अपिलकर्ता यांना नाही व त्यामुळे रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्ट यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश करु शकत नाही. सदरची माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाने उपलब्ध करुन घेऊन पुरविणे अशी कार्यपध्दती आहे व त्यामुळे सदरचे अपिल हे मंजूर करण्यास पात्र होईल.

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून अपिलकर्ता यांना हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसाचे आत जन माहिती अधिकारी, धर्मादाय आयुक्त तसेच जन माहिती अधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांनी माहिती उपलब्ध असल्यास विनामूल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.२०/१२/२०१०** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९८४३-/अपील क्र.७००४/२०१०**

**श्री.रुपेश लेहनाजी शिंदे** **अपीलार्थी**
**भीमरत्न निवास, एम.ई.एस.ऊर्दू**
**हायस्कूल शेजारी, महाजनवाडी, हलानपूल,**
**कुलौ पश्चिम, मुंबई ४०० ०७०**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप नियंत्रक**
**नियंत्रक वैधमापन शास्त्र,महाराष्ट्र राज्य,मुंबई कार्यालय,**
**शासकीय कुटीर क्र.७ फ्री प्रेस, जर्नल मार्ग, मुंबई ४०००२१**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहा.नियंत्रक** **उत्तरवादी**
**धर्मादाय आयुक्त म.रा. कार्यालय, ८३, डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी,मुंबई ४०० ०१८**

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक २१.९.२०१०
सुनावणीचा दिनांक २०/१२/२०१०.
अपीलार्थी अनुपस्थित.. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित

२. अपिलकर्ता यांनी दि.२८.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी नियंत्रक **वैधमापन**शास्त्र यांच्याकडे **नियंत्रक वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या विभागीय व जिल्हा तसेच ग्राहक संरक्षण यंत्रणेतील पदांकरिता १५सप्टेंबर २००९ रोजी अर्ज मागवून परिक्षा प्रक्रियाही पूर्ण झाली असतानाही मुलाखतीसाठी अजुनही बोलविण्यांत येत नसून भरतीच्या प्रक्रियेची माहिती** मागितलेली दिसून येते. सदरची माहिती साधे टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.६.८.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले परंतू प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सुनावणीच्यावेळी अपिलकर्ता गैरहजर होते परंतू त्यांचे वतीने वकिल श्री.विनोद दोंदे हे उपस्थित होते परंतू त्यांनी कोणत्याही प्रकारचे अधिकार पत्र सादर केलेले नाही व त्यामुळे त्यांना प्रतिनिधी म्हणून नाकारण्यांत आलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलर्ता यांना दि.१०.१२.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे याचा अर्थ आयोगाचे कार्यालयातून दि.३०.११.२०१० रोजी अपिल सुनावणी नोटीस काढल्यानंतर अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तोपर्यत माहितीचा अर्जास ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा कोणताही निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, भरती प्रक्रियेच्या संदर्भात वरिष्ठांची मंजूरी घेतल्यानंतर माहिती पुरविता येत नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे. परंतू ज्या पध्दतीने दि.१०.१२.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याच

पध्दतीने माहिती अर्जाच्या अनुषंगाने ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देता आली असती व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यात तत्कालीन जन माहिती अधिकारी हे बेजबाबदार असल्याचे दिसून येत आहेत व ते दोषी आढळून येत आहेत. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम २० (२) नुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस होणे आवश्यक आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय ३० दिवसांचे आंत देणे आवश्यक असते. परंतू त्याबाबतही कोणत्याही प्रकारे दखल घेण्यांत आलेली नाही. माहिती उपलब्ध असल्यास व नसल्यास त्याप्रमाणे स्पष्टपणे कळविणे आवश्यक असते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा त्यांची जबाबदारी पार पाडलेली नाही व त्यामुळे त्यांनी अधिनियमांच्या तरतुदीचे व शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे. त्याकरिता सदरचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून अपिलकर्ता यांचे दि.२८.६.२०१० रोजीच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यांत येते. शिस्तभंगाची कारवाई ही नियंत्रक, वैधमापन शास्त्र यांचे कार्यालयातील सक्षम अधिकारी यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या अपिलाची एक प्रत नियंत्रक, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडे स्वतंत्रपणे पाठविण्यांत यावी.**

**२. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय न दिल्याने अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन केलेले आहे तरी त्यांचेविरुध्द प्रशासकिय कारवाई त्यांच्या सक्षम अधिकारी यांनी करावी.**

**३. अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

४. **अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.२०/१२/२०१०** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत**

**१.नियंत्रक, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य,मुंबई कार्यालय,**
**शासकीय कुटीर क्र.७ फ्री प्रेस, जर्नल मार्ग, मुंबई ४०००२१**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९८४०-/अपील क्र.७००३/२०१०**

**श्री.नरहरी शांताराम थोरात अपीलार्थी**
**एम/१०२, श्री दत्त दिंगबर सह.गृह नि.संस्था**
**गौरी शंकर वाडी नं.१, पंतनगर, घाटकोपर पूर्व, मुंबई ४०००७५**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा`अभियांत्रिकी कक्ष-१**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रा पूर्व मुंबई ४००० ५१**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(घाटकोपर) उत्तरवादी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रा पूर्व मुंबई ४००० ५१**

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक २१.९.२०१०

सुनावणीचा दिनांक २०/१२/२०१०.

अपीलार्थी उपस्थित. जन माहिती अधिकारी अनुपस्थित व अपिलीय अधिकारी उपस्थित

२. अपिलार्थी यांनी दि.६.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, सहाय्यक अभियंता, घाटकोपर एसआरए यांच्याकडे दि.७.११.२००३ ते आजतागायत या कालावधीतील श्री.दत्त दिगंबर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कार्यालयासाठी इमारत एच मधील सदनिका क्र.०५ तळमजला ही राखीव ठेवण्यांत आली होती. तिचे आरक्षण बदलण्यांत आले आहे त्या आदेशाची प्रत मिळण्याबाबत तसेच (सोबत लोकआयुक्त यांचे दि.७.११.२००३ चे पत्र) सदर माहिती व्यक्तिशः घेऊन जाणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांना दि.१५.७.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतू दि.१२.८.२०१० रोजी अपिलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२१.९.२०१० रोजी व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाच्या प्रमाणे तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही मात्र दि.१२.८.२०१० रोजीची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते ती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे. जन माहिती अधिकारी हे सुनावणीच्या वेळी अनुपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जन माहिती अधिकारी हे आज उपस्थित नसल्यामुळे त्यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ते त्यांना माहित नाही. दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जे कागदपत्र दाखल केलेली आहेत ती अनावश्यक व अपिलार्थीच्या इतर अर्जाच्या संदर्भातील दाखल

केलेली आहेत. त्यावरुन कोणत्या अपिलाच्या संदर्भात कोणते कागदपत्र दाखल करावे याची सुध्दा सामान्य ज्ञान जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांना आहे असे दिसून येत नाही.

४. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे अधिनियमाच्या कलम २०(२)अन्वये शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्क आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचेविरुध्द सुध्दा प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे व त्याकरिता अपिल मंजूर करण्यांस पात्र आहे.

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्याने अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन केलेले आहे तरी त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची असून त्याकरिता सदरच्या निर्णयाची प्रत ही स्वतंत्रपणे झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणाचे प्रमुखाकडे पाठविण्यांत यावी.**

**२. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचे कार्यालयातील सक्षम अधिकारी यांनी त्यांचेविरुध्द प्रशासकिय कारवाई करावी.**

**३. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.२०/१२/२०१०** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**

**राज्य माहिती आयोग, मुंबइ**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९८४४-/अपील क्र.७००६/२०१०**

**श्री.रेगी पीटर डायस** **अपीलार्थी**
**घर नं.३१ कालिना, १ ला मजला,**
**कालिना गांव, सांताक्रुझ पूर्व, मुंबई २९**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग कार्यालय,**
**प्रभात कॉलनी, १३७, टी.पी.एस.-४ रोड नं.२, सांताक्रुझ पूर्व,मुंबई ४०००५५**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(इ व का)** **उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग कार्यालय,**
**प्रभात कॉलनी, १३७, टी.पी.एस.-४ रोड नं.२, सांताक्रुझ पूर्व,मुंबई ४०००५५**

*---निर्णय---*

द्वितीय अपीलाचा दिनांक २१.९.२०१०
सुनावणीचा दिनांक २०/१२/२०१०.
अपीलार्थी उपस्थित. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित

२. अपिलकर्ता यांनी दि.४.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी एच/पूर्व वॉर्ड(इ व का),सांताक्रुझ यांचेकडे पुढीलप्रमाणे माहिती मागितली होती :-

**a) " As per order dt 27/01/2010 in AO No. 1270 of 2009 along with CA No. 1590 of 2009 Mr. Xavier apperating for the corporation on instructions from Mr.Sanjiv V.Pradhan sub engineer, Nuilding 7 factory H/East ward stated in the open court that the corporation will not demolish the structure mentioned in the notice dated 23/10/2008 without following the due process of law I) what process of law was the officer referring to when the statement was made ii) what action has been taken to follow the due process of law till date iii) submit the copy of the action taken "**

सदरची माहिती स्पीड पोस्टने घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.७.७.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले, प्रथम अपिलाच्या निर्णय दि.१०.८.२०१० रोजी देण्यांत आलेला नसून, माहिती विहित मुदतीत देण्यांत आलेली नाही असे जन माहिती अधिकारी यांचे निदर्शनास आणून देण्यांत आलेले आहे. परंतू त्यांनतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.  सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असून त्यांनी आयोगापुढे कोणतेही कागदपत्र सादर केलेले नाहीत. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती आजपर्यंत उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती कां लादण्यांत येऊ नये अशी आयोगापुढे सादर केलेल्या व्दितीय अपीलामध्ये विनंती केली आहे.  जन माहिती अधिकारी हे आयोगापुढे सुनावणीच्या दिवशी उपस्थित झालेले नाहीत व कागदपत्रेही दाखल केलेले नाहीत यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम २० (१)अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे.  प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे त्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून अपिलार्थी यांचे दि.४.६.२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती विहित मुदतीत दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) यांनी  अधिनियमाच्या कलम २०(१)अन्वये रुपये १०,०००/-  शास्ती लादण्यांत येत असून सदरच्या शास्तीची वसुली त्यांच्या दरमहाच्या वेतनातून करण्यांत यावी व पुढील लेखाशिर्षाखाली जमा करण्यांत यावी.**

**"  लेखाशिर्ष क्र.००७- इतर प्रशासनिक सेवा**

**६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा (१८)**

**२.  माहितीचा अधिकार (००७००१६-१) "**

**३. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचे कार्यालयातील सक्षम अधिकारी यांनी त्यांचेविरुध्द प्रशासकिय कारवाई करावी.**

**४. ४. सदरच्या निर्णयाची एक प्रत, आयुक्त, महानगरपालिका यांना स्वतंत्रपणे पाठविण्यांत यावी.**

**५. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.२०/१२/२०१०**

**(विलास पाटील)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.**

**क्र-मुमाआ/४९८४५-/अपील क्र.७००७/२०१०**

**श्री.रेगी पीटर डायस** **अपीलार्थी**
**घर नं.३१ कालिना, १ ला मजला,**
**कालिना गांव, सांताक्रुझ पूर्व, मुंबई २९**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा`कार्यकारी अभियंता (विशेष)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग कार्यालय,**
**प्रभात कॉलनी, १३७, टी.पी.एस.-४ रोड नं.२, सांताक्रुझ पूर्व,मुंबई ४०००५५**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(इ व का)** **उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग कार्यालय,**
**प्रभात कॉलनी, १३७, टी.पी.एस.-४ रोड नं.२, सांताक्रुझ पूर्व,मुंबई ४०००५५**

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक २१.९.२०१०
सुनावणीचा दिनांक २०/१२/२०१०.
अपीलार्थी उपस्थित. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित

२. अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी एच/पूर्व वॉर्ड(इ व का),सांताक्रुझ यांचेकडे पुढीलप्रमाणे माहिती मागितली होती.

**" colour /Xerox copies of Potographs as subkitted by Mr. Ralph Miranda of house No.32 Kalina village santacruz east Mumbai 400029 with his application for repairs as per dispatch no. 12508 dt 07.08.2007 or colour / Xerox copies of photographs taken by inspeciton team. (copy of black &white xerox copy enclosed for your ready reference) (b)A sketch plan showing dimension of the structure i.e. House No.32 Kalina village, Santacruz east mumbai 400029 (c)Furnish the record of visits to the above site after the repair permission No. ACHE/12508/AEBT dt.19.4.2008 was granted date wish and the findings. "** सदरील माहिती स्पीड पोस्टने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.७.७.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय दि.९.८.२०१० रोजी देण्यांत आलेला असून त्यात प्रथम अपिलाचा निर्णय न देता, जन माहिती अधिकारी यांनी

माहिती दिली नाही एवढेच निदर्शनास आणलेले आहे व त्यामुळे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर होते व त्यांनी कोणतेही कागदपत्र आयोगापुढे सादर केलेले नाहीत. अपिलकता र्यांनी त्यांचे दि.१३.५.२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून शास्ती कां लादणंत येऊ नये अशी विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.३.५.२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे कलम ७ (१)प्रमाणे ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम २०(१)अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस दिली होती परंतू त्याचाही खुलासा त्यांनी केलेला नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनीही अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन केलेले आहे व त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई त्यांच्या सक्षम अधिका-यांनी करावी. त्यामुळे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यांत येत असून, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यांत यावी.**

२. **अपलिार्थी यांचे दि.३.५.२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून जन माहिती अधिकारी तथा सहाययक अभियंता (इ व का) यांनी अधिनियमाच्या** कलम २०(१)अन्वये रुपये १०,०००/- शास्ती लादण्यांत येत असून सदरच्या शास्तीची वसुली त्यांच्या दरमहाच्या वेतनातून करण्यांत यावी व पुढील लेखाशिर्षाखाली जमा करण्यांत यावी.

" लेखाशिर्ष क्र.००७- इतर प्रशासनिक सेवा
६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा (१८)
माहितीचा अधिकार (००७००१६-१) "

३. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचे कार्यालयातील सक्षम अधिकारी यांनी त्यांचेविरुध्द प्रशासकिय कारवाई करावी.

४. सदरच्या निर्णयाची एक प्रत, आयुक्त, महानगरपालिका यांना स्वतंत्रपणे पाठविण्यांत यावी.

५.. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.२०/१२/२०१० (विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.

**क्र-मुमाआ/४९८६५-/अपील क्र.६१९०/२०१०**
**क्र-मुमाआ/४९८६३-/अपील क्र.६१९१/२०१०**

**श्री.अर्जुनलाल छाब्रिया** **अपीलार्थी**
**बेले व्हिस्ता प्लॅट नं.१५ ३ रा मजला लेक आणि**
**एल.आय.सी. ऑफीससमोर, एस.व्ही.रोड वांद्रे,**
**मुंबई ५०**

**१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा`पोलिस उपआयुक्त**
**झोन IX व्हिला रोड, बांद्रा पश्चिम मुंबई ५०**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त(पश्चिम प्रदेश)** **उत्तरवादी**
**कार्टर रोड,बांद्रा पश्चिम मुंबई ५०**

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक २०.९.२०१०
सुनावणीचा दिनांक २०/१२/२०१०.
अपीलार्थी जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपिल क्र.६०९०/२०१०

२. अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे श्री. बरकत बी.(वसाया) पटेल यांच्या संदर्भात दि.१७.३.२०१० रोजी शौकत बी.पटेल/निस्सार बी. पटेल यांच्या विरुध्द दाखल झालेल्या तक्रारीच्या संदर्भात ८ मुद्यात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेऊन जाणार असे नमूद केलेले आहे.

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.२०.५.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपिलकर्ता हे स्वतः कधीही सुनावणीस हजर होत नसून ते श्री. कापसे यांना प्रतिनिधी म्हणून पाठवितात परंतू प्रतिनिधी यांनी आयोगापुढे असे सांगितले त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.१२.६.२०१० रोजी वर्सोवा पोलिस ठाणेची माहिती सहायक पोलिस आयुक्त, डी.एन.नगर यांचे कार्यालयामार्फत या कार्यालयास प्राप्त झाली असून ती पृष्ठ क्र १ ते २ सोबत जोडण्यांत आलेली आहे असे कळविलेले असल्याचे दिसून येते. श्री. कापसे यांनी दि.२१.७.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे. सुनावणीच्या वेळी श्री.कापसे हे प्रतिनिधी महणून उपस्थित होते, तरीही आयोगापुढे त्यांनी माहिती उपलब्ध झाली नाही असे सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे सांगितले. या कारणास्तव आयोगापुढे सुनावणीस प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहण्यास परवानगी दिल्यास त्यांना याबाबत काहीही माहिती नसते व आयोगाचा वेळ वाया जातो. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अर्जदाराच्या अशिलाच्या तक्रार अर्जाबाबत चौकशी करुन अर्ज दप्तर दाखल केले असून श्री.शौकत बी पटेल व निझार बी पटेल यांच्या नोंद केलेल्या जबाबाच्या प्रती अर्जदाराच्या अशिलांना दिलेल्या आहेत. परंतू मुद्या क्र.४ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल तर ती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपिलकर्ता यांचे अपिल अंशतः मंजूर करण्यांस पात्र आहे.

२.    अपिलकर्ता यांनी दि.३.५.२०१० रोजी श्री.अख्तर अली अन्सारी यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारी संदर्भात ८ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.४.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे व्दितीय अपिल दाखल केलेले आहे. अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही परंतू जन माहिती अधिकारी, सहायक आयुक्त यांनी असे सांगितल की, सदरची माहिती ही त्यांचे प्रतिनिधी हयांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू ही बाब श्री.कापसे यांना माहिती नव्हती त्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

**अपिल क्र.६०९०/२०१०**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल क्र.६०९०/२०१० हे अंशतः मंजूर करण्यांत येत असून दि.३.५.२०१० च्या अर्जातील मुद्या क्र.४ च्या संदर्भात माहिती उपलब्ध असल्यास त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात.**

**२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**अपिल क्र.६०९१/२०१०**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल क्र.६०९१/२०१० निकाली काढण्यांत येते.**

**२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई**

दि.२०/१२/२०१०

(विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील.

क्र-मुमाआ/४९५१९-/अपील क्र.६१५९/२०१०
क्र-मुमाआ/४९५२३-/अपील क्र.६१६३/२०१०

श्री.चंद्रकात अमृतलाल मर्चट — अपीलार्थी
राणे बिल्डिंग व खंबाटा पठाण चाळ,मोझेस रोड,
वरळी, मुंबई ४०००१८

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता
कार्यकारी अभियंता(इ.प्र.)शहर-१ यांचे कार्यालय,
ई विभाग महापालिका कार्यालय,३ रा मजला,
शेख हाफिमुद्यीन मार्ग, भायखळा, मुंबई८

२. जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) — उत्तरवादी
कार्यकारी अभियंता(इ.प्र.)शहर-१ यांचे कार्यालय,
ई विभाग महापालिका कार्यालय,३ रा मजला,
शेख हाफिमुद्यीन मार्ग, भायखळा, मुंबई८

*---निर्णय---*

व्दितीय अपीलाचा दिनांक २५.८.२०१०
सुनावणीचा दिनांक १३/१२/२०१०.
अपीलार्थी जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपील क्र.६१५९

**२.** अपिलकर्ता यांनी दि.२२.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, (इ.व का.)(शहर इ वॉर्ड) यांचेकडे सीएस क्र.११२/११३ लोअरपेरल डिव्हीजन मुंबई १८, ३२मजली वास्तुचे अे.अे.सेक्शन व बी.बी. सेक्शन असे दोन नकाशे न दिल्याने ते मिळणेबाबत तसेच आर.जी. लँड २ मोजमापणीचे २ नकाशे कार्यालयीन सर्व्हे निरिक्षणाची प्रत देणेबाबतची माहिती मागितली आहे. अपिलकर्ता यांनी दि.५.५.२०१० रोजी सदरच्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अवलोकन करण्याकरिता व त्यातून आवश्यकत्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती घेण्याकरिता कार्यपध्दती व खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे दि.२५.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि.७.७.२०१० रोजी दिलेला असून जन माहिती अधिकारी यांनी रहिवाश्यांच्या प्रमाणित प्रती इत्यादिच्या खर्चाचा भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यांत याव्यात, असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू त्यानंतरही अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे नकाशे दिले नाहीत व रहिवाशांचे यादीसह दिले नाही असे कारण दाखवून व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, जी माहिती मागितलेली होती ती पूर्णतः दिलेली नाही. तसेच अवलोकनासाठी बोलविण्यांत आले ते योग्य नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, इमारत व प्रस्ताव विभाग हा रहिवाशांची यादी प्रमाणित करीत नाही. त्याप्रमाणे काही नकाशे हे सांक्षाकित करुन देतात, काही देत नाही आणि म्हाडाही प्रमाणीत प्रत देते. तसेच आर.जी. प्लॅनच्या संदर्भामध्ये सध्या सांक्षाकित प्रत वापरली जाते. या संदर्भामध्ये सुध्दा त्यांना कळविण्यांत आले होते. याबाबतची माहिती या विभागाच्या अखत्यारित येत नाही त्यामुळे ती माहिती मिळू शकत नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (त्र) नुसार "माहिती अधिकार" याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणाच्या

नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे त्यामध्ये :-

(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे इ. अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००५ मध्ये प्रमाणित प्रतीची फी नमूद केलेली आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना विहित मुदतीत कळविलेले दिसून येते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले आहे असा अर्थ होत नाही. वास्तविक अपिलकर्ता यांनी नस्तीचे अवलोकन करुन त्यातून त्यांना आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती या मिळवून घेता आल्या असत्या परंतू त्यांनी व्दितीय अपील दाखल केले असून सुध्दा पुन्हा त्यांना नस्तीचे अवलोकन करुनच त्यांना माहिती उपलब्ध करुन घेता येईल व त्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यांस पात्र आहे.

**अपील क्र.६१६३/२०१०**

४. अपिलकर्ता यांनी दि.२६.५.३०१० रोजी जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता (इमारत व प्रस्ताव ) यांचेकडे सीएसटी क्र.११२ व ११३ येथील खंडावरील निष्कासित वास्तुबाबतची माहिती मागितली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्ता यांना दि.२५.६.२०१० रोजी नस्तीचे अवलोकन करण्याकरिता कळविण्यांत आले होते. परंतू अपिलकर्ता यांनी नस्तीचे अवलोकन न करता दि.२१.७.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले.पारदर्शक भ्रष्टाचाराचा शोध घेण्याबाबत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कारण देऊन प्रथम अपिल दाखल केलेले आहे. प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितल्याचे दिसून येते की, अपिलकर्ता यांनी सदरच्या नस्तीचे निरिक्षण करुन त्यांना हव्या असलेल्या प्रती त्यांनी घेतलेल्या आहेत व प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी कोणत्या प्रकारची माहिती त्यांना पाहिजे ते सांगू शकलेले नाहीत व त्यामुळे त्यांना पुन्हा जर नस्तीचे निरिक्षण करावयाचे असल्यास त्यांनी ते करावे असे विवेचन करुन अपिल निकाली काढण्यांत आलेले आहे. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, नस्तीचे निरिक्षण दिले जात नाही परंतू प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी अपिलकर्ता उपस्थित होते व त्यावेळेस त्यांनी २० पेक्षा जास्त वेळा नस्तीचे निरिक्षण केलेले आहे. हे त्यांचे उपस्थितीतच सांगितलेले आहे. परंत ूत्यांना निश्चित कोणते कागदपत्रे हवी आहेत हे अपिलार्थी यांना सांगता येत नाही व ते वारंवार अर्ज करीत असतात. त्यामुळे त्यांना नक्की कोणती माहिती पाहिजे आहे ते निश्चित सांगू शकलेले नाही व प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये नस्तीचे अवलोकन करण्याच्या संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (त्र)मध्ये 'माहितीचा अधिकार ' व्याख्येमध्ये कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकाराच्या संदर्भामध्ये नस्तीचे अवलोकन करुन छायांकित प्रती करुन घेणे अशी तरतूद आहे व त्याबाबत जर अपिलार्थी यांना सदरच्या नस्तीचे वारंवार निरिक्षण करावयाचे असल्यास मात्र त्यांना निरिक्षण करता येणार नाही निरिक्षण एकाच वेळी करुन माहितीउपलब्ध करुन घेता येईल. त्यांनी व्दितीय अपील मेमोमध्ये सुध्दा नस्तीचे निश्चित असे वर्णन दिलेले नाही व इमारत प्रस्ताव या विभागाने माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत वेळोवेळी नस्तीचे निरिक्षण करण्यासाठी अपिलार्थीना संधी दिलेली आहे त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

आदेश

अपिल क्र.६१५९/२०१० व अपिल क्र.६१६३/२०१०

१. अपिलकर्ता यांचे उपरोक्त दोन्ही अपीले निकाली काढण्यांत येतात.
२. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.

मुंबई
दि.२०/१२/२०१० (विलास पाटील)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत

सचिव/कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, मुंबई

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय **अपील.**

**क्र-मुमाआ/४९८८२-/अपील क्र.७०२३/२०१०**
**क्र-मुमाआ/४९८८३-/अपील क्र.७०२४/२०१०**
**क्र-मुमाआ/४९८८४-/अपील क्र.७०२६/२०१०**
**क्र-मुमाआ/४९८८५-/अपील क्र.७०२७/२०१०**

**प्रति,**
**श्री.अर्जुनलाल छाब्रिया** **अपीलार्थी**
**बेले व्हिस्ता प्लॅट नं.१५ ३ रा मजला लेक आणि**
**एल.आय.सी. ऑफीससमोर, एस.व्ही.रोड वांद्रे,**
**मुंबई ५०**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा डेप्युटी चिफ ऑफीसर, म्हाडा**
**म्हाडा कार्यालय, गृहनिर्माण भवन, बांद्रा पूर्व, मुंबई ५१**
**२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई**
**३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलिस उपायुक्त परि-१२,**
**शैलेंद्र नगर यांचे कार्यालय, दहिसर पूर्व, मुंबई.**
**४. प्रथम अपिलीय अधिकारी,उपसचिव, गृह विभाग, मंत्रालय,मुंबई**

**१. जन माहिती अधिकारी तथा इस्टेट मॅनेजर नं.२,** **.उत्तरवादी**
**म्हाडा कार्यालय, गृहनिर्माण भवन, बांद्रा पूर्व, मुंबई ५१**
**२.जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,मुंबई**
**३.जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त, उत्तर नियंत्रण कक्ष**
**ठाकूर व्हिलेज, कांदिवली पूर्व,मुंबई.**
**४.जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.**

***---निर्णय---***

**व्दितीय चारही अपीलाचा दिनांक २३.९.२०१०,**
**सुनावणीचा दिनांक २२/१२/२०१०.**
**अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपील क्र.७०२३/२०१०**

**अपिलकर्ता यांनी दि.१३.४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी मिळकत व व्यवस्थापक, नं.२ म्हाडा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती :-**

1. **is it a fact that the complaint has been made by me on behalf of unity co-op Hsg society and its office-bearers vide Ref/AMC/802/2010 and Fef/AMC/803/2010 dated 17.3.2010 to the Honble Mantralaya Ministers, Honble Mantralaya Bureaucrats, Nonble Police Authorities and Honble Housing Authorities including Mhada against Akhtar Ali Ansari for obtaining Row House at D/46 Royal Hills, CHS Dindoshi Goregaon East Mumbai400 065 by giving forged false and fabricated documents.**

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.७.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता गैरहजर होते. जन माहिती अधिकारी म्हणून उपसंचालक, पणन हे उपस्थित होते व प्रथम अपिलीय अधिकारी,उपमुख्य अधिकारी हे उपस्थित होते. परंतू त्यांनी कोणताही खुलासा किंवा कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. परंतू जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहितीच्या अधिकारामध्ये ज्या तक्रारीची माहिती मागितलेली आहे ती तक्रार दक्षता विभागाकडे चौकशीकरिता पाठविण्यांत आलेली होती. पणन विभाग हे वाटपाकरिता व मिळकत व्यवस्थापक हे निष्कासनाच्या सदंर्भातील कार्यवाही करिता असल्याने सदर तक्रार दक्षता विभागाकडे हस्तांतरीत केलेली आहे. त्यामुळे सदर तक्रार ही मुळात दक्षता विभागाकडे असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. तसेच अर्जदाराच्या अर्जामध्ये सुध्दा अर्जदाराने सदरची तक्रार ही Honble Mantralaya Ministers, Honble Mantralaya Bureaucrats, Nonble Police Authorities and Honble Housing Authorities including Mhada यांना दिलेल्या असल्यामुळे सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये कोणत्या विभागाने आणि कोणत्या शाखने कार्यवाही करायची आहे ते स्पष्ट होत नसल्यामुळे सदरच्या तक्रारीबाबात योग्य निर्णय घेता आलेला दिसून येते नाही. अपिलकर्ता यांनी माहिती विचारताना "**Is it a fact the complaint has been made by me on behalf of Unity Co-op Hsg.Society and its office bearers**". अशा प्रकारे माहितीच्या अर्जात वर्णन केलेले आहे व त्यामुळेच सदरच्या विषयाच्या संदर्भामध्ये कोणत्या विभागाने किंवा कोणत्या शाखेने निर्णय घ्यावयाचा आहे किंवा उत्तर द्यावयाचे आहे हे निश्चित होत नसल्यामुळे त्यांना माहिती ही उपलब्ध करुन देता आलेली नाही. परंतू संपूर्ण माहितीबाबत मिळकत व्यवस्थापक व पणन विभागामध्ये शोध घेतला असता सदरची तक्रार ही दक्षता विभागाकडे आहे असे कळविल्यावर दक्षता विभागाकडे विचारणा करण्यांत आली होती व त्यांच्याकडून आता माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्यांत आली.

अपिलकर्ता यांचे दि.१७.३.२०१० च्या तक्रारीच्या संदर्भामध्ये जो चौकशी अहवाल उपलब्ध झालेला असेल त्या चौकशी अहवालाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अपिलकर्ता यांनी इतर २ ते ८ मुद्यांमध्ये जी माहिती मागितलेली आहे त्या संदर्भात सुध्दा चौकशी अहवालाचे कागदपत्र उपलब्ध असतील ते सर्व उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

अपिलकर्ता यांनी अर्ज करताना स्पष्टपणे व थोडक्यात माहिती जर मागितली असती तर ती माहिती उपलब्ध करुन देणे हे जन माहिती अधिकारी यांना सुलभ झाले असते. परंतू अनेक ठिकाणी तक्रार करुन अनेक ठिकाणी मोघम माहिती मागितल्यास त्याचा शोध घेण्यास बराच कालावधी जातो. त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे मान्य केलेले असल्याने सदर अपिल मंजूर करण्यांस पात्र आहे.

**अपीलक्र.७०२४/२०१०**

**२.** अपिलकर्ता यांनी दि.५.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृहनिर्माण विभाग यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

Is the it a fact the complaint has been made by me on behalf of Unity Co-op Hsg.Society and its office bearers vide Ref/AMC/802/2010 and Ref/AMC/803/2010 dated 17.03.2010 to the Honble Mantralaya Ministers, Honble Mantralaya Bureaucrats, Honble police Authorities and Honble Housing Authorities and Honble Housing authorities including MHADA against Akhtar Ali Ansari for obtaining Row House at D/46,Royal Hills CHS Dindoshi Goregaon East Mumbai 400065 by giving forged false and fabricated documents.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१०.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. अपिलकर्ता गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातील जी माहिती आहे त्या माहितीचे दि.१७.३.२०१० रोजीच्या अर्जात "**Honble Mantralaya Ministers, Honble**

**Mantralaya Bureaucrats, Nonble Police Authorities and Honble Housing Authorities including Mhada** " **असे** वर्णन केलेले आहे. त्यामुळेच त्यांना नेमक्या कोणत्या तक्रारीवर माहिती हवी आहे त्याचा अर्थबोध होत नाही. जन माहती अधिकारी यांनी खुलासा करताना असे सांगितले की, सदरचा अर्ज गृह विभागास दि.५.५.२०१०चा अर्ज दि.२८.६.२०१०रोजी प्राप्त झाला व त्याप्रमाणे गृह विभागच्या जन माहती अधिकारी यांनी दि.१५.७.२०१० रोजी पत्र पाठविले व आवश्यकती सहपत्रेही पाठविली. परंतू तत्पूर्वी अपिलकर्ता यांनी दि.१०.६.२०१० रोजी प्रथम अपिलीदखल केले होते. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दि.२०.७.२०१० रोजी दुपारी ३.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यांत आली होती. परंतू अपिलकर्ता अपील सुनावणी अनुपस्थित राहिल्यामुळे अपिलीय अधिकारी यांनी अपील निकाली काढले. वरील वस्तुस्थिती पाहता जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली असून अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा दोन वेळा सुनावणीची संधी दिलेली आहे तसेच श्री.छाब्रिया हयांनी हे अपील निकाली काढण्यासाठी विनंती केलेली आहे.

अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती त्यांचे दि.१७.३.२०१० रोजी केलेल्या तक्रारीच्या कार्यवाहीची माहिती मागितलेली आहे. परंतू दि.१७.३.२०१० रोजीची तक्रार "Honble Mantralaya Ministers, Honble Mantralaya Bureaucrats, Nonble Police Authorities and Honble" या सर्वच ठिकाणी त्यांनी पाठविली होती ज्याप्रमाणे त्यांनी त्यात माहितीचे वर्णन केलेले आहे ते मोघम स्वरुपाचे आहे. वास्तविक हया तक्रारी त्यांनी त्या त्या विभागातील वेगवेगळया अधिका-याकडे करावयास हव्या होत्या. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन घेता आली असती. परंतू अनेक विभागाचा एकाच तक्रारीमध्ये अंतर्भाव करुन एकाच तक्रारीत अनेक विभागाकडे माहितीची मागणी केलेली आहे त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदींचा गैरवापर अपिलीर्थीनी केलेला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (त्र)मध्ये माहितीचा अधिकार व्याख्येमध्ये कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकाराच्या संदर्भामध्ये नस्तीचे अवलोकन करुन छायांकित प्रती करुन घेणे असा असल्याने त्या त्या संबंधित विभागाकडे माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे तर ती माहिती ३० दिवसात उपलब्ध होऊ शकते. मात्र अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती तक्रार त्यांचे विभागात शोध घेऊन न सापडल्याने विलंब झालेला असल्याचे दिसून येते. गृहनिर्माण विभागाने सुध्दा सदरील तक्रारी मध्ये वेळोवेळी दि.१८.६.२०१०, १५.७.२०१०, ५.५.२०१० रोजी,उपाध्यक्ष,मुख्य कार्यकारी अधिकारी, गृहनिर्माण यांच्याकडे सुध्दा तक्रार हस्तातरीत केली दिसून येते. त्यामुळेच माहितीउपलब्ध होण्यास विलंब झालेला आहे असे निदर्शनास येते. त्यामुळे अर्जदाराने सुध्दा माहिती ही निश्‍चित त्याच विभागाकडे मागणे आवश्यक असते.

तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा अपिलार्थी सुनावणी अनुपस्थिततेच्या कारणामुळे अपील निकाली काढणे योग्य नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(५)अन्वये माहिती उपलब्ध करुन देणे ही जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे व त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही वा का उपलब्ध करुन दिली नाही अशा प्रकारची चौकशी करुनच प्रथम अपिलाचा निर्णय देणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे उल्लंघन केलेले असल्याचे दिसून येते. परंतू सदरचे प्रकरणाची चौकशी मुळात म्हाडाच्या दक्षता विभागाने करावयाची असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**अपील क्र.७०२६/२०१०**

अपिलकर्ता यांनी दि.५.५.२०१० रोजी जन माहती अधिकारी तथा सहायक पोलिस आयुक्त, पश्‍चिम नियंत्रक कक्ष यांचे कडे दि.१७.३.२०१० च्या तक्रार अर्जासंबंधात माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती **Honble Mantralaya Ministers, Honble Mantralaya Bureaucrats, Nonble Police Authorities and Honble Housing Authorities including Mhada** यांचे कडे ही तक्रार केलेली असल्यामुळे या सर्व विभागाकडे ती माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी

दिंडोशी, पोलिस ठाणे, वांद्रे कुर्ला संकुल पोलिस ठाणे यांचेकडे दि.२०.५.२०१० रोजी पाठविण्यांत आली आहे व त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन त्यांना देण्यांत आली. तरी अपिलकर्ता यांनी दि.१५.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे. सदरच्या अपिलाच्या सुनावणीस अपीलकर्ता उपस्थित राहिले नाही व त्यामुळे अपील निकाली काढण्यांत आलेले असल्याचे दिसून येते. अपिलकर्ता यांनी व्दितीय अपील दाखल केले परंतू अपिलकर्ता हे अपिल सुनावणीस गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढील अर्जाच्या संदर्भामध्ये केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती सांगितली व सदरच्या अर्जातील तक्रार ही त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसलयामुळे त्याबाबत दि.२८.५.२०१० रोजी अपिलकर्ता यांना कळविण्यांत आलेले होते. अपिलकर्ता यांना तसे कळविण्यांत आलेले होते. अपिलकर्ता यांनी मागविलेली माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि.१७.३.२०१० रोजी ज्या अनेक विभागाकडे उदा. Honble Mantralaya Ministers, Honble Mantralaya Bureaucrats, Nonble Police Authorities and Honble Housing Authorities including Mhada कडे त्यांनी तक्रारीच्या संदर्भात माहितीबाबतचे वर्णन मोघम केलेले आहे. प्रत्येक विभागाने या तक्रारीच्या नस्तीचा शोध/तपास केलेला असून सदर माहिती त्या विभागस उपलब्ध नसल्याचे दिसून येते.त्यामुळे माहिती अधिकारी यांचा दोषी आहे असे आढळून येत नाही म्हणून सदरचे अपिल निकाली काढण्यास पात्र आहे.

**अपील क्र.७०२६/२०१०**

**अपिलकर्ता यांनी दि.५.५.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, तथा अवर सचिव,गृहमिर्नाण विभाग यांचेकडे खालील माहिती मागितलेली दिसून येते.**

Is the it a fact the complaint has been made by me on behalf of Unity Co-op Hsg.Society and its office bearers vide Ref/AMC/802/2010 and Ref/AMC/803/2010 dated 17.03.2010 to the Honble Mantralaya Ministers, Honble Mantralaya Bureaucrats, Honble police Authorities and Honble Housing Authorities and Honble Housing authorities including MHADA against Akhtar Ali Ansari for obtaining Row House at D/46,Royal Hills CHS Dindoshi Goregaon East Mumbai 400065 by giving forged false and fabricated documents.

परंतू विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.१०.६.२०१० रोजी प्रथम अपिली दाखल केले. दि.१४.७.२०१०रोजी सदर तक्रार गृहनिर्माण विभागास असल्याने अर्ज हस्तांतरीत केलेला आहे. परंतू त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगास व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीस अपिलकर्ता गैरहजर होते. अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती दि.१७.३.२०१० रोजीच्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीच्या संदर्भात मागितलेली आहे. परंतू अपिलकर्ता यांनी सदर माहितीचे " Honble Mantralaya Ministers, Honble Mantralaya Bureaucrats, Nonble Police Authorities and Honble Housing Authorities including Mhada" कडे त्यांनी तक्रारीच्या संदर्भात वर्णन मोघम केलेले आहे. त्यामुळे प्रत्येक विभागास सदरच्या तक्रार अर्जाचे हस्तांतरीत करण्याशिवाय दुसरी कोणतीही कार्यवाही केलेली आहे असे दिसून येते नाही. मुळात सदरच्या तक्रारीत असे दिसून येते की, सदरचा तक्रार अर्ज हा म्हाडाच्या दक्षता विभागात चौकशीसाठी पाठविण्यांत आलेला होता व त्या तक्रारीचा अहवाल सुध्दा म्हाडाच्या कार्यालयात उपलब्ध आहे असे म्हाडाचे अपील क्र.७०२८/१०च्या संदर्भात असल्याचे सांगितले व त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये सुध्दा अपिलार्थी यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये जी कार्यवाही झालेली आहे ती अपिलार्थी यांनी मागितलेली आहे. व त्यामुळेच हा विलंब झालेला असल्याचे दिसून येते. प्रथम अपिलाचा निर्णय सुध्दा त्यामुळेच दिलेला नाही असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले म्हणून सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**मोघम अर्जामुळे शोध घेण्याचे श्रम वाया जातात व अधिका-यास त्यांचे दैनंदिन कामसुध्दा करता येत नाही. त्यामुळे यापुढे अशा निरर्थक विव्दतापूर्व अर्ज करण्याचे टाळून सुटसुटीत माहितीचे वर्णन करुन माहिती मागणे अपेक्षित आहे.**

**वरील सर्व अपिलाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या कार्यालयातून नोटीस निर्गमित करण्यांत आलेली आहे. त्यात माहितीच्या अर्जा संदर्भात तसेच प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये योग्यतो खुलासा व कागदपत्रे सादर करण्याचे आदेश केलेले आहेत. तरी सुध्दा काही जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा व कागदपत्रे आयोगापुढे सादर केलेली नाहीत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हे सुनावणीस जरी उपस्थित राहून त्यांनी त्याचा युक्तीवाद केलेला आहे परंतू यापुढे आयोगासमोर उपस्थित राहताना प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे व खुलासा हा आयोगापुढे सादर करणे आवश्यक आहे.**

**अधिनियमाच्या कलम १९(५) अन्वये माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबाबत सिध्द करण्याची जबाबदारी ही जन माहिती अधिकारी यांची आहे. जर ते दोषी नसतील तर ते शास्तीस पात्र नसतील व ते दोषी असतील तर शास्तीस पात्र असतील याची नोंद घ्यावी.**

**माहितीचा अधिकार अधिनियम १९(१)अन्वये प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामधील यथास्थिती केंद्रिय जन माहिती अधिकारी किंवा जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अधिका-याकडे म्हणजेच प्रथम अपिलीयअधिकारी यांचेकडे करण्याचा उद्देश असा आहे की, त्यांचे स्तरावर अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली पाहिजे.परंतू प्रथम अपिलीय अधिकारी हे अपिल योग्य रितीने पार पाडित नाही असे दिसून येते. प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा नाही याबाबतची माहिती घेऊन किंवा माहिती दिली असल्यास ती योग्य आहे किंवा नाही हे तपासून निर्णय देणे आवश्यक असते. बहुतांश प्रथम अपिलीय अधिकारी हे प्रथम अपिलाचा निर्णय देत नाहीत किंवा निर्णय दिला तरी कोणत्याही प्रकारची चौकशी न करता जन माहिती अधिकारी यांनी योग्यती माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे निरर्थक निर्णय देत असतात त्यामुळे अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन करणारे आहे. यापुढे आयोगापुढे येताना निर्णय देताना अशा प्रकारचे सर्व प्रक्रियेची पूर्तता करुनच उपस्थित झाले तरच आयोगापुढे त्यांचे म्हणणे ऐकून घेता येईल, अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यांत येईल.**

## आदेश

१. **अपिलकर्ता यांचे अपील क्र.७०२३/२०१०** अंशतः मंजूर करण्यांत येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत उर्वरित माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यांत यावी. त्याकरिता अपिलार्थी यांनी १० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तिशः उपस्थित होऊन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२. अपिलकर्ता यांची **अपील क्र.७०२४/२०१०,अपील क्र.७०२६/२०१०,अपील क्र.७०२७/२०१०** निकाली काढलेली आहेत.

**३. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.२०/१२/२०१०** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग`ा, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२३५/अपील क्र.७०४१/२०१०**

**क्र-मुमाआ/नोंदणी क्र.५०२३६/अपील क्र.७०४१/२०१०**

**श्री.फरीदा धारीवाला** **अपीलार्थी**
**प्लॅट नं.६०१/६०२, रिझवी महल,**
**वॉटरफिल्ड रोड, बांद्रा पश्चिम मुंबई ५०**

**विरुध्द**

**१.प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त, परिमंडळ-९**
**हिल रोड, बांद्रा (पश्चिम)मुंबई.५०**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त** **उत्तरवादी**
**पश्चिम नियंत्रण कक्ष व माहिती अधिकारी यांचे कार्यालय,**
**बांद्रा पश्चिम, मुंबई ५०**

***---निर्णय---***

**व्दितीय अपीलाचा दिनांक २६.१०.२०१०**
**सुनावणीचा दिनांक २४/१२/२०१०.**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलीय अधिकारी अनुपस्थित**

अपील क्र.७०४१/२०१०

अपिलार्थी यांनी अपिल क्र.७०४१ मध्ये दि.१२.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, सहायक पोलिस आयुक्त, पश्चिम नियंत्रण कक्ष,यांच्याकडे त्यांच्या घरात दि.२३.९.२००९ रोजी झालेल्या चोरीच्या संदर्भामध्ये आतापर्यत झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सोबत मोबाईल चोरीला गेला त्या संदर्भामध्ये चोरीला गेलेल्या मोबाईलवरील फोन कॉल्सचा तपशिल तारखेसह जोडलेला आहे व एफ.आय.आर. ची प्रत सोबत जोडलेली आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.५.५.२०१० रोजी माहिती अधिकार २००५ मधील कलम ८(ज) प्रमाणे माहिती देता येत नाही असे अर्जदारास कळविले असल्याचे दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दि.१.६.२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दि.२.७.२०१० रोजी अपिलार्थी यांनी त्यांच्या मुळ अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या अनुषंगाने सहायक पोलिस आयुक्त व माहिती अधिकारी अधिकारी, पश्चिम नियंत्रण कक्ष यांनी अपिलार्थी यांनी समाधानकारक उत्तर दिलेले आहे असे कळविले असल्याचे दिसून येते व त्याने समाधान न झाल्याने अपिलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे ि व्दतीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलार्थी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, दि.१२.३.२०१० रोजी सद रचा अर्ज दिला होता परंतू ३० दिवसाचे आत म्हणजे विहित मुदतीच्या आत कोणतीही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेले नाही. मात्र दि.५.५.२०१० रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिली त्यात त्यांनी केलेल्या तक्रारीबाबतची माहिती उपलब्ध नाही व ती माहिती उपलध करुन देता येणार नाही असे त्यांनी उत्तर दिलेले आहे. यावरुन आतापर्यत त्यांनी सदरच्या गुन्हयाचा कोणत्या प्रकारे तपास सुरु आहे किंवा नाही याबद्दलची माहिती उपलब्ध करुन दिली

नाही व याबाबत जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मुळे माहिती अधिकाराचा अर्ज हा त्या कार्यालयातून संबंधित माहिती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, बांद्रा पोलिस स्टेशन, येथे वर नमूद केलेल्या अर्जातील गुन्हयाच्या कार्यवाही बाबत माहिती देण्यासाठी पाठविण्यांत आला होतो. तसेच अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या व्दितीय अपिलाच्या संदर्भामध्ये वरिष्ठ पोलिस निरिक्षक, बांद्रा पोलिस स्टेशन यांच्याकडून खुलासा मागविला असून संबंधित चौकशी तपासणी अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणाच्या सुनावणीसाठी त्यांचे दालनात विहित वेळेत उपस्थित राहण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यावरुन वरिष्ठ पोलिस निरिक्षक,बांद्रा यांचा खुलासा आ.क्र.१३८८११/२० दि.२२.१२.२०१० अन्वये प्राप्त झालेला असून तो सोबत जोडलेला आहे. अर्जदार यांनी मागणी केल्यानुसार बांद्रा पोलिस ठाणे येथे दाखल असलेल्या गु.के.३३६/२००९ कलम २७९/४२५ भादवि १८४/१८५ ची प्रत दिलेली आहे त्यावर अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी चोरी झाल्यानंतर तक्रार दिलेली होती. परंतू त्या तक्रारीच्या संदर्भात कोणतीही दखल घेतलेली नव्हती म्हणून त्यांनी गुन्हा दाखल केलेलाआहे व त्या गुन्हयाच्या संदर्भात कोणती कार्यवाही झाली याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी माहितीच्या अधिकारामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत अर्ज केलेले आहे तरी सुध्दा माहिती दिली गेली नाही. वास्तविक पाहता एफ.आय.आर दि.२३.९.२००९ रोजी दाखल झालेला होता त्यासंबंधी झालेच्या तपासाची माहिती दि.१२.३.२०१० पर्यत देण्यास हरकत नव्हती व जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती सुध्दा मुदतीच्या बाहेर उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५(४) ' प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास जन माहिती अधिकारी यांना सहाय्य घेता येते त्याप्रमाणे त्यांनी बांद्रा पोलिस स्टेशन, वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचेकडे सदरचा अर्ज हस्तारीत करण्यांत आला होता. याच अर्जाच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलिस निरिक्षक, बांद्रा पोलिस स्टेशन यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व ती त्यांनी उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विहित मदुतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५(५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, बांद्रा पोलिस स्टेशन यांना माहिती अधिकारी समजण्यांत येते व त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१)अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. यामुळे सदरची अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

अपील क्र.७०४२/२०१०

अपिलार्थी यांनी दि.१२.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, सहाय्यक पोलिस आयुक्त, पश्चिम नियंत्रण कक्ष यांच्याकडे मोटार बाईक वरुन त्यांच्या बॅगा चोरीला गेल्याची त्यांनी दि.२७.७.२००९ रोजी तक्रार केली होती त्या संदर्भातील तपासाबाबतची माहिती मागितल्याचे दिसून येते. माहिती व्यक्तिशः घेऊन जाणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता संबंधित अर्ज बांद्रा पोलिस स्टेशन,वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांच्याकडे अर्ज करण्यांत आला होता. परंतू अपिलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि.१.६.२०१ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही मात्र दि.२१.७.२०१० रोजी सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये गुन्हा नोंदणी क्र.२७२/२०१० कम ३७९/३४ भादवि अन्वये गुन्हा दाखल केलेला असून सदर गुन्हयाच्या सांक्षाकित प्रती सोबत जोडण्यांत आलेल्या आहेत अशी माहिती कळविलेली आहे. सदरच्या अर्जाची चौकशी पोलिस उपनिरिक्षक श्री.चकोर केलेली आहे व त्यांनी बांद्रा पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल केलेला आहे असे कळविलेले आहे. परंतू त्यानंतरही अपिलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, ज्या ज्यावेळी पोलिस स्टेशनमध्ये त्यांच्या तक्रारीत काय तपास झाला याबाबत चौकशीसाठी जात होतो त्या त्यावेळी तेथील पोलिस अधिकारी यांनी एका पोलिस अधिका-याकडून दुस-या पोलिस अधिका-याकडे चौकशी करण्यासाठी जायला सांगत असत व काहीही माहिती द्यायला तयार होत नव्हते. त्यामुळे त्यांनी तक्रार केल्यानंतर गुन्हा रजिस्टर केला त्यावेळी सुध्दा गुन्हा

रजिस्टर केलेला नव्हता. गुन्हा रजिस्टर केल्यानंतरही या तपासाबाबत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

तक्रारदारास त्यांच्या तक्रारीसंदर्भामध्ये तपासाची प्रगती काय झाली ही माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. तक्रारदार हे गुन्हयाच्या तपासामध्ये कोणत्याही प्रकारचे परिणाम करतील अशी कोणतीही भिती वाटणे हे माहिती उपलब्ध करुन न देण्याकरिता अनावश्यक कारण दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांचा अर्ज हा दि.१५.३.२०१० रोजी सहायक जन माहिती अधिकारी, वरिष्ठ पोलिस निरिक्षक बांद्रा पोलिस ठाणे यांचेकडे हंस्तातीत केल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ५(४)नुसार सदर प्रकरणी अपिलास सहाय घेण्यांत येते त्यास माहिती अधिकारी समजण्यांत येते. अपिलकर्ता यांना माहिती देताना जाणूनबुजून चुकीची व उशिरा माहिती दिलेली असल्याने त्यांना अधिनियमाच्या कलम २०(१)अन्वये प्रत्येक दिवसाकरिता रु.२५० एवढया रक्कमेची शास्ती लादण्याची अधिनियमात तरतूद आहे याची नोंद घ्यावी असे नमूद केलेले असल्यामुळे संबंधित पोलिस ठाणेमध्ये संबंधित पोलिस अधिकारी हे माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली म्हणून दोषी आढळून येतात. तसेच चौकशी माहिती आतापर्यत तक्रारदार यांना उपलब्ध करुन देण्यास विलंब केल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**क्र.अपील क्र.७०४१/२०१०**

**आदेश**

**१. अपिलकर्ता यांचे क्र.७०४१ अपिल मंजूर करण्यांत येत असून, अपिलकर्ता यांनी त्यांचे एफ.आय,आर. प्रमाणे आतापर्यत काय तपास झाला ती माहिती हे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यांत यावी.**

**२. अपलिार्थी यांचे दि.१२.३.२०१० रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून व जन माहिती अधिकारी सहायक पोलिस आयुक्त, यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, बांद्रे पोलिस ठाणे यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सहाय्य घेतले असता माहितीचा अधिकार अधियिम २००५ च्या कलम ५ (४)नुसार त्यांना माहिती वेळेत उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांच्या विरुध्द त्यांना जन माहिती अधिकारी समजण्यांत येऊन त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम ५(५)शास्ती कां लादण्यांत येऊ नये याचाबाबत खुलासा आयोगापुढे समक्ष येऊन १० दिवसाचे आत हे निर्णय मिळाल्यापासून सादर करावा अन्यथा शास्ती कायम करण्यांत येईल, याची नोंद घ्यावी.**

**३. अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

**क्र.अपील क्र.७०४२/२०१०**

**१. अपिलकर्ता यांचे अपिल क्र.७०४२/२०१० मंजूर करण्यांत येत असून, अपिलकर्ता यांना हे अपिल निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे संबंधित गुन्हयाच्या संदर्भाबाबतची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात अपिलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.**

**२. जन माहिती अधिकारी व पोलिस निरिक्षक, बांद्रा पोलिस स्टेशन यांनी अधिनियमाच्या कलम ५(४)अन्वये व ५(५) अन्वये अर्ज हस्तांतरीत केलेला असल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी समजण्यांत येते व त्यांनी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली यास्तव रुपये ५,०००/- एवढी शास्ती कां लादण्यांत येऊ नये याचा खुलासा आयोगाकडे १० दिवसाचे आत समक्ष येऊन करावा. अन्यथा शास्ती कायम करण्यांत येईल व त्यांच्या दरमहाच्या वेतनातून शास्तीची वसूली करण्यांत येईल.**

३. **अपिलार्थी व उत्तरवादी यांना निर्णयाच्या प्रती देण्यांत याव्यात.**

मुंबई

**दि.३१/१२/२०१०** **(विलास पाटील)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मा.मुख्य माहिती अ ायुक्त, मुंबई यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत**

**सचिव/कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**